नाताळ २५ डिसेंबर २०२२

# कादोडी

अकरावा वहरी  एकून १८ वॉ अंक

( खाजगी वितरण)



Design : Paul Dmello

# कादोडी

## नाताळश्या हनाव विशेषांक

२५ डिसेंबर २०२२

अकरावा वहरी

एकून अठरावॉ अंक

खाजगी वितरन

## या अंकात .......


सुकुर मावलीऑ कृपाप्रसाद - फा. फ्रान्सिस दिब्रिटो

भारन्या - पॅट्रीक कोरीया

माटुंग्या गेलो रे! - आयवन क्रास्टो

मरसू दादय - बावतीस पेडीकर

बदलती सृष्टी, आमशी द्रुष्टी – जोज्या तुसकान

पुना भॅटॅदा गा -- विजु वाझ

भंगारात विकिलेल्या घराइ कानी - सॅबी परेरा

'दिनार' सॉ आलॉ पूर... - ईनास तूस्कानो

बंड्याव जालॉं आप्पा - सिरील मिनेझीस

बी. टी. क्लब - अँथनी परेरा

जीवनाई संजीवनी – फा. (डॉ.) रॉबर्ट बी. डिसोझा

विनोदी कान्यो - बबिता राजेश डिसोजा

बो तू रांद आन मा पॉटाई नांद - रिचर्ड मच्याडो

खीत - सबिना फोस

वंशायो दिवॉ – आब्राहाम तुस्कानो


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान नातॅ आपला या अंकाविषयीसा मत, संपादक मंडळाश्या कुनालाही भॅटॉन जरूर कळवा.


**प्रमुख संपादक**

ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**कार्यकारी संपादक**

एडवर्ड डिसोजा

**सहसंपादक**

सुनील डिमेलो

**संपादक मंडळ**

सायमन रॉड्रिग्ज, तेरेजा डिसोजा, जेम्सन डिमेलो, डॅनियल मस्करणीस, रॉबर्ट फर्नांडिस, राजन डिमेलो, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो, सिरील मिनेझीस

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :- www.kadodi.in**


या अंकात प्रसिद्ध जालॅल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांॲ आमॅ खूप आभार मानत्याव.

**नाताळसॉ हन सब्बान कुपाऱ्यांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**

**सूचना:-** 'कादोडी' या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायदॅ तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९ / ८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

## कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी

आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा

*१२ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत*

ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर - द.सा.द.शे. **६.१०%** व्याजदर

**सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ५.८०% व्याजदर**

**७% ते ११.२५%** व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**शैक्षणिक कर्ज किफायतशीर व्याजदरात - ८%**

**घरबांधणी कर्ज द.सा.द.शे. ७.९०% व्याजदर**

**फ्लॅट खरेदी द.सा.द.शे. ७% व्याजदर**

**शॉप, गाळे, मशिनरी खरेदीसाठी द.सा.द.शे. ९% व्याजदर**

**रू. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण**

**नियमित कर्ज भरणा करणा-यांना व्याजात २% रिबेट**

**३० नोव्हेंबर २०२२ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

* भागभांडवल रु. १२.९९ कोटी
* कर्जे रु. १६०.९५ कोटी
* ठेवी रु. २९५.१५ कोटी
* गुंतवणूक रु. २१६.९९ कोटी
* एकूण व्यवसाय रु. ४५६ कोटी
* सभासद संख्या १६३२५
* निव्वळ एन. पी. ए. **०%**

* दि. ३१/०३/२०२२ अखेर नफा रु. ६.६५ कोटी

शाखा -

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा (प.) |
|---|---|---|---|---|---|
| फोन :८००७९५५४३० | मो. ७२६१९१९०१२ | मो. ०८५५०९१०२६४ | मो. ७२६१९१९०१३ | मो. ०८५५०९१०६४३ | मो. ७८७५८९५५०८ |

लता जे.फोस<br>मुख्य कार्यकारी अधिकारी

मॅथ्यू ए. डिसोजा<br>उपाध्यक्ष

सिल्वेस्टर ए. दोडती<br>अध्यक्ष

व

संचालक मंडळ

# सुकुर मावलीऑ कृपाप्रसाद -- फा. फ्रान्सिस दिब्रिटो

माला आठवातॅ, तिगाळा मॅ शाळीत हॉतॉ हायस्कूलला. माइ बोठी वयनी जानुबाय इला बनू आन लुजान यो दोन पोऱ्यो. रितीनुसार पोऱ्यामांगे पॉर पावतॉ. ती बॅताम पराथना मागन्यो करॅशी. ती वागनॅनॅ बॅताम धार्मिक होती. आमशा घरापासून ५ कोसोर आगायसा सेंट जेम्स चर्च हाय. त्याकाळी उत्तर वसय मिनॅ फक्त तडेस ‘नित्य साहाय्यक मातेऑ नॉवॅनॉ हॉऑसॉ. नॉवॅना करता वयनी सलात सलात आगाय दॅवळा जाशी. त्याकाळी रस्तॅ खराब हॉतॅ. वयनी माला, तिआ दोन पोरींना मिंजॅ माआ दोनु पुतन्यांना हरी घ्याशी. वयनीइ भक्ती वाखानन्या हारकी होती. तिगाळा ‘नित्य साहाय्यक मावलीऑ’ नॉवॅनॉ परतेक मंगळवारॅ अहॅसॉ. नव मंगळवारशी भक्ती पार पडल्योर कय आठोड्यात वयनीनॅ आमाला 'गॉड बातमी' दिली. वयनीला दी गॅलॅ.

वयनीऑ पक्कॉ विश्वास हॉतॉ. ती हांग्याशी, ‘माला पॉरूस हॉनार. नव मयनॅ भरल्योर वयनीनॅ  पॉराला जन्म दिलॉ. तॅआ पॉराइ तब्येत सुरुवातीला नाजूकूस होती. जॅला जक्ले देव समजॅशे तॉ अरनाळसॉ डॉक्टर एन्. पी. गाळवणकर ऑ माआ बॉठ्ठ्या बाहासॉ खास दोसत. डॉक्टरांशो आमशा घारा फेऱ्यो हॉया लागल्यो. माकून आमी जकल्याइ  मावलीला ‘गराना’ घायला. आस्तॅ आस्तॅ पॉराला आराम पडत गॅलॉ आन आमसॉ जीव हॅवसॉ जालॉ / भांड्यात पडलॉ. नवसाआ पॉर ! कृपेआ पॉर ! मावलीनॅ आमशी पराथना आयकीली. एक दोन वहरात नंदाखाल देवळा ‘नित्य साहाय्यक माते’ऑ नॉवॅनॉ सुरू जालॉ. तडे  वयनी आन आमे जक्ले जाशे. ख्रिस्ताला आपल्या पराथनेत वरशी जागा हाय इ माइत हाय. तरीपन हरएक ख्रिस्ती लॉका काळजा कुपीत मावली करता जागा हाय. ती तही अहलीस पाय.

खुरूसा पायापा प्रभू ख्रिस्तानॅ मरिया मातेला आपली आय कॅलॅ.


"May the Christmas Season bring only happiness and joy to you and your family."
MERRY Christmas
& HAPPY NEW YEAR
BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD.
ESTD. 1918
(SCHEDULED BANK)
Board of Directors & Board of Management
Ryan Fernandes
Chairman
Simon Soares
Vice Chairman
Sixto Fargose
Acting CEO
Roshan Pereira
General Manager
Head Office : Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy, Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra
Board Lines : 9527441600 / 9527451600 / 9527461600 / Toll Free : 1800-266-2407 | www.bccb.co.in




## अंकाकरता देनगी :-

सुनिल बा. डिमेलो, नंदाखाल - २००० ₹

डॅनियल मस्करणीस, वाघोली – २००० ₹

ख्रिस्तोफर रिबेलो, सॉकाळा - २००० ₹

सचिन मेंडिस, बोळींज - १००० ₹

स्टिफन रॉड्रिग्ज, नंदाखाल - ५०० ₹

शालोम फॅमिली, राजोडी - ५०० ₹

एडवर्ड डिसोजा, वाघोली – २००० ₹

सायमन रॉड्रिग्ज, आगाशी – २००० ₹

तेरेजा डिसोजा, सार्स गार्डन – १००० ₹

सॅबी परेरा, नानभाट - ५०० ₹

ब्रेसवेल लोपीस, बोळींज - ५०० ₹

दिलीप परेरा, आगाशी - ५०० ₹

# भारन्या -- पॅट्रीक कोरीया, (नंदाखाल-अमेरिका)

बनाबाय. कही हा तू? बो टॅप जाला मिंजॅ आजीये मैनॅा जालॅा तू भेटली नाय. आंगबिंग नाय ना तापला? आला आत्याय ताप पटकान मस्तकी सडात्यात. तहॅा हायदॅ तॅ माला कळव्यासा गनाय. माला कळता तॅ जक्ला घर कादो गळतां? आला बी कय नाय ना पान ठावांव ठावठिकानॅा ठॅायादो मदत जालोशी. अडनेतडने धोवसोळ केली गा जरा पॅराडॅा कमी हॅातॅ. घरात एक माहनू शिक अहला गा जक्ल्योरतीस पॅंडॅा पडातॅ. माला जॅ मदतीला बोलविला तॅ मॅ कय परकॅा नाय ना. लानपनी आखिरी टायमात आंबॅ टुक्या जाशे तिगाळा मॅ बॅाल्यासॅा - आबोरशा डोकरे आंबॅा पाड लो, एक घाव मॅ खायनॅ आन एक बनाला देनॅ. आठवाते  ना?

भेट नाय भगुन बजारा गॅलतॅा तडने वळालॅा. तुयी खितू आली गा आन जरा कामू निंगाला. “मुगले मुगले नास लो” गीता मिने आपून लानपनी

“बना ओव्ळ्या लिकाल्यो, लिकाल्यो।
बनाला आलॅ बाय आंबॅ, आंबॅ।
मम्बय नेता पिकलॅ, पिकलॅ।

आहां बॅालतोते ना? ततपासून माला लिक्यासा जाला गा तुआस ऑव्ळ्या मॅ लिकातोतॅा. आज माला लिक्यादो वाटलॅ आन गरज पन वाटले. तू जवळशी वाटाता मनून आलॅा. गानॅतसा बन आन तू बना, यांत खूप फरक हाय पन तिगाळा कुनाला का माईत हॅाता?

आज बजारा मा दरी एक टोपला भेंड्याआ हॅाता. एक टोपला वांग्याआ हॅाता आन एक दोदी हॅातॅा. कावडूस कऱ्योतीला, पन कडे मा खबाट -बिबाट खशेदॅं भगून, आन कावडीआ बजारभाडा जास्ती भगून, एकोरएक टोपला ठोईला, आन दोदी हाथात धरलॅा आन बजारा आल्तॅा. हाकोबोटशी काळोखात माला  मेली सुंबळू कडॅ दिखली नाय. तहॅा रोजकापडाव हुडकॅा घॅऑन तॅाहॅास बजारा निंगाल्तॅा.

बजारा  ता उंडाला बाबुलाल भैयां माला का विसारतॅ हायदॅ ? माला हांगातॅ - “भावलनी, ये कद्दू (दोदी) कैसे दिया?” भावलनी...? माला बॅाठा नवाल वाटला आन मनून

मॅ अँगातॅंगा डॉकायलॉ. तॅ बगीतॅ आपलॅ ओळखिअॅ पासवाळॅ अॅका कॉपऱ्यात उबे हात, अन मा वर डॉकावॉन फिदी फिदी दातांए फळे काडॉन आहातॅत. माला जाम राग आलॉ. वाटला एकेकाई थॉबाडीत माऱ्याई. पन बिशारॅय दातबित पॉपकॉर्नश्या घतीन कडॅ बार पडद्यात आन नाय ती पंचायत हॉयदॅ .

आन काल वांगे खुडलोते तॅय काटॅ लागॉन माये बोटे हुजलोते भगून विसार बदललॉ. या पासवाळ्याई भैयाला हांगी अहल्या बिगर तॅआ भैयाला “भावलनी” मिंजॅ का ता कडनॅ कळला?

तॅआ पासवाळ्या कंपू मिनॅ पानमाळीसा ता कासुल्या मंगा पन हॉता. परशा वहरा एकदा तॅनॅ माला “वैनी” बोयलता तिगाळा मॅ तॅआ कारभारनी दरी, मिंजॅ पशीदरी गराना कॅलता. पशी मा वर्गाशी ला. पशी माला बोयली जे मंगा दारू पॅऑन साप फुकाट गॅलॅ आन फुगलॅ. तॉ रॉज हाकुबोटसॉ उठातॅ आन आहारॅत डॉकायतॅ. फुगल्या गाला पायान तॅला तॅय गालामांगशे कान आहारॅत दिखात नाय. “पशे माय कान कडॅ दिखात नाय तॅ” आहा विसारतॉ आहातॅ. पशी माला हांगातॅ “गाडी घॅऑन दारापुडॅ भंगारवाळॅ फिरातॅत आन प्लास्टीक घॅऑन लहन देतॅत ना, तहॉ कुन तॅआ मंगाला घॅदॅ तॅ ती लहना बदल्यात मंगाला द्या तयार हाय.” इत पोत तिला तॅव विट आलॅ. तॅई गोष्ट होड. पन बी वारू हॉतॅ ना तॅ जकलॅ आपल्या गावश्या गोट्या पिरेल शा घरशे हॉतॅ. धुताऱ्यो धोन्ड्या, मिजेशी मन्या आन फुकटखाव फरशा! पिरेलश्या घरशे जव तव मा पितरालास पुरलॅलॅ आहातॅत. तॅंना फाटल्यात पाय कॉहॉ घालॅसॉ आन पडल्या डॉख्यात लात कही घाल्याशी ता नॅमका मायती. मॅ घारा जावॉन शेवतूला ई बोयलॉसॉ पण शेवतू बरी तॅ बरी, नातॅ हिंगोर घेदॅ आन खराखोटा कऱ्या निंगॅदॅ. आन माला फशी पाडदॅ भगून तूआ दरी आलॉ. जी विधवा हॉतॅ तिआ नवरॉ मॅलॅआ एक दुख आन माथा खड्ड्यासा ता दुहरा दुख, अहे दोन दुखे आहातॅत. तहा मा जालॅ.

आज माव बाप जिवंत असतॉ तॅ कॉडा बरा जालोसा? बाबाई खूप आठोन येतॅ ला. खूप मिंजॅ खूपूस भॉटॉ माव आधार गॅलॉ ला. भरल्या गाड्योरनॅ रनोर पागी टाकॉन मुत्या जातॅत तॉहॅ तॉ उठॉन अचानकूस मा मनाला रकरक लावॉन गॅलॉ ला. माला तॉ काईमसॉ हांग्यासॉ, “पोरा , तुला भाआ नाय मिंजॅ आधार नाय, तॅ तू या गोट्या घरानॅआ उस्तीला कत्तेस लागॉ नाका. ई खॉटा घराना मॅ जवळनॅ बगिलॅ. या घरश्ये मतू आन कतू वायले

उतारले तॅ हालतॉ आडवॉ वाटीलॉ आन  मुहाळ आन सुलीत फुक मारॅशी फुकनळी उभी वाटीली. कादो तॅ कुनालास तॅव वापर करता आलॉ पा नाय. आहा खॉटापन आंगात होता भगून या खॉट्या घरान्याबरबर लागॉन आयुष्य फुकट नाका घालवॉ. मांदेळ्या करता होडक्या नाका बुडवॉ. तू उंदराव पोर हा भुगून तू लोखंडाय वॅव्हार करॅ जाव नाका. ई मायी तुला विनंती नाय तॅ आज्ञा समज. तुयो उड्यो आयबापा दरी आन जास्तीत जास्ती हावूहऱ्या दरी सल्ह्यात पन बी कडॅ उड्यो माऱ्या जायदा तॅ मार खावॉन येदा. कुराडीये नाळ हडत्यात तहॉ तुला हडद्यात. शेवतूला भाआबेन नाय. मिंजे तुला हाळॉ बिडाव नात. एक तॉ अरदॉ आन दोगे ते सौगे.” कॉडा मॉलाआ हांगना ई?

पिरेल आन कुरेल यायी लडाई खूब वहरापासून पड्याशी. जराक्सा कय टासुकटूसुक जाला गा दांडॅबडगॅ निंग्याशॅ. मनून माला बॉल्या वाटे नाय ला. विनाकारन मा नावासॉ बॉंबाटॉ हॉयदॅ. एकदा ऑहॉस खूब मारॉ पडलॉतॉ आन कोड्यो बोंबो हाको जालत्यो! आमशा बदा बायनॅ तॅआ मारॅव बॅतान धसकॉ घॅटलॉ. मारॉ हॉऑन दोन वहरान तिआ लगीन जाला पन तॅआ धसक्या पायान ती लगीन जाल्या नंतर कय वहरान मेली. तिला तॅआ माऱ्यापायान भेदऱ्यो जालॉ ला. डॉक्टर हांगातॅ बाळतपनात मेली पन माला वाटातॅ ती तॅआ मारॅआ पायानूस मेली. तॅआ मारॅत पिरेलश्या झ्यावनॅ एक लांबा टॉकार आढॉन आमश्या हिंदाळ्योर जॉराय मारला. टॉकार जुना हॉता आन विवळी लागलोती भगून नातॅ नुकसान कॉडा जालॉसा मायती हाय गा? पोरे पारे जकले घाबरले गनाय! पन देव वरनॅ बगितॅ ला. आला दोन वहरान तॅला कुनाई नंदार लागली कुनाला मायीत. पन तॅआ झ्यांवला दोन संडास जालॅ आन तॅआ बळ घडक्यात विताळला. हॉतॅसॉ तॉ नवतॉ जालॉ आन खाशेत गॅलॉ. पिरेलशा त्या घारा कुन पॉर जन्मा आला गा आमसॉ डॉकरॉ दादा बॉल्यासॉ “पॉरांदो, हांबळा हा. पिरेलशा बाजूनॅ मारॉ करॅदो एक दांडूक वाडला.”

बना तुला मायती हाय मॅ गावा करता का कॅलॅ ता. गावात नव्यो ओआरो याशो. तॅतशा खूब जनींना हावळ्यो वळता याशो पन बिड्डीता याशो नाय. तिगाळा मॅ लागॉन हावळ्यो बिड्डील्यात. गावात लुगड्यावाळा यासा तॅला गावशो बायको “शेठ ये कैसा दिया, शेठ वो कैसा दिया” विसरॅशो. आला पन आपल्या बायकांई समज नाय हॉये जॅ ता लुगड्यावाळा पॉटापान्याकरता मॅला लोकां दारांमिगरनॅ फिरातॅ. तॅला शेठ बॉलॉन कय लुगडा सस्त्यात मिळनार हाय गा? तिगाळा मॅ ठराव कऱ्या बायकांना मदत करतोतॉ. किती वखत मॅ

झेंडाबजारला जाऑन हायतनी लुगडे हाडॉन दिल्यात. कुनकुना बाईला आंबाडॉ बरॉ दिख्यासॉ. पन जिआ माथास कमी हाय तिला वेनी बरी दिखेदॅ. ई गोष्ट खरी गनाय? ता मॅ जॅ हांगिला तॅ मॅ कय वाइट कॅला गा हांगू? कोंबडी तात्योर मांड्यादो, मुड्ड्याशे आंबॅ घाल्यादो, फुग्याला पिठ घाल्यादो भरती ओहटी मायती अह्या लागातॅ. भरती कतॅ आन ओहटी कतॅ ता मॅ हांगिला तॅ तॅत बायकीपन कठ्त्ये आला? भरल्या कोळनीआ टांग्यात एकलॉ टांग्यावाळॉ कोळन्या मांडीला मांडी टॅकॉन बॅहातॅ तॅला कुन बायकुटा बॉलातॅ गा? ता जकलॅना सलातॅ गनाय? आला तिगाळा रडपती आलेल्या ओआरांना मॅ लोळ्यो कह्यो वळ्याशो आन ऑटॉ हारविताना पट्टे कहॅ काड्याशे ता हिकविले. आतॅ जकले शाने जाले. दारापुडॅ बांगड्या वाळा मिनार आलॅ आन एकेक करोन बांगडी सडवितॅ, तॅ त्यो बांगड्यो टिसात्यात ता माला दिखातॅ. तॅ मॅ तॅला दोनदोन तिनतिन सुडॅ एकत्र सडव आहा हांगिला तॅत मॅ का बॉठा पाप कॅला? माआ बॉलन्यान फायदॉस जालॉ ना? तॉटॉ तॅ नाय जालॉ?

पन बॉलतॅत ना जॅला वैती ठरविन्यात आलॅ तॉ वैती तॉ वैतीस रॅतॅ. मारणाऱ्याव हात धरता येतॅ पन बोलनाऱ्या तोंड कुन धरदॅ? ई जगूस तहा हाय. परमेश्वरांव एक शे एक पॉर जगात आल्तॉ तॅला या जगानॅ होडला नाय, तडे मायी का बिशात? माला संसार हाय तॉ करॅ लागातॅ भुगून, नातॅ मॅ यांना बरबर दाखडतोतॉ ला. संसारानॅस जकलॅना अडविलॅ. येशू ख्रिस्तानॅ ऑडॅ चमत्कार कॅलॅ आन लॉकांना बरा कॅला आन ५००० लोकांना जिव्या घायला पन तॅला बायकू आन पोरे असते तॅ अहा कय तॅला करता आलोसा गा मला हांगू?

मॅ सॉताई समज घालतॅ जॅ घाबऱ्यासा कय काम नाय. या मिनसा कुन पान मा सादा पिकला अंगाठ पन मोडू शकॅसॉ नाय. भॉखॅद्यात भॉखॅद्यात आन रॅद्यात. शेवटी परमेश्वर हाय. तॅनॅस लाजारसला मॅल्यातनॅ उठविला लाजारस मिंजॅ लाजनारॉ आहास हायदॅ ला. तॉ पान तिनशार बेनॅव ॲकलॉस भाहा गनाय! मिंजॅ मा घतूस हायदॅ! मॅ जरासॉ लाजाळू हाय पन तॅला आतॅ का करॅसा. आला मॅ लाजाळू नाय ना. मला लाजाळू बनविलॅ. मॅ सात वहराव हॉतॉ तिगाळा बिडी पॅऑन रॅलेले थोडके टाकित्यात ना ते जमवॉन जकलॅआपुडॅ प्यासॉ. तॉ मॅ लाजाळू गा?

कतॅ कतॅ ई दुख सहन हॉॲ नाय माला! दॅवा पुतानॅ , गुरूवारॅ हांज तॅ हुक्रूवारॅ दोपारशा तिन पोत सहन कॅला. पान माला आज किती वहरे जालॅ सहन करॅ लागातॅ? तॉ सुकीआ न्यायान हायदॅ, पन कय तरी रितीनुसार राजरोस पनॅ मारलॉ गॅलॉ. पन माला कुहनी रित गा न्याय न करतास कय बॉलनॅय मारातॅ? तॅला रोमन शिपायायी मारला. पन माला या

गाजल्या-फुगल्या दरने कय मारातॅ? धुताऱ्यो धोन्ड्याला बरा काम लागलोता, तॅ तडॅ लफडा कॅला तहॉ माथा खड्डॉन तॅला घारा धाडला. मन्या पायाला भुंडुळ्यो फुटल्यात त्या करता तॉ खळू टुकॉन सलातॅ भगून तॅला मिजेशी मन्या बॉलत्यात. फरशानॅ भायखाळा लागला तॅ हॉपाऱ्यापोत ऑड्या लॉकांना फशविलॅ गा आमसॉ मास्तर हांगातॅ - जर कुन ऑहॉ माहनू हाय दॅ कि जॅला मालाय टायमोरती आन पुरॅशॉ पुरॅ पैशे फरशादरनॅ मिळाल्यात हायदॅ, तॅ तॅआ माहानाव सत्कार जालॉ पाय’. आज पोत तरी ऑहॉ माहनु मिळालॉ नाय. लगीन कॅला ता पान “नाना दाखडलॉ आन फरशो वराडलॉ.” तर मॅ यांना गाजले-फुगले बॉलातॅ ता कय सुकीआ हाय गा? आन अह्या लॉकांदरनॅ माला ऑ शब्दाव मार खा लागातॅ? ऑ शब्दाव मार शारीरीक मारापेक्षा कॉडॉ भयानक आन जहरी हाय यायी कुनाला कल्पना हाय गा? दॅवादरी एकुस प्रार्थना हाय जॅ - “दॅवा, तुआ राज्यात तरी, जॉहॉ अपराध हायदॅ तहीस शिक्षा हायदॅ ना? मंग माव अपराध कुहूनॉ? कॉडॅ मॅ खून कॅल्यात आन मुडदॅ दडविल्यात? कॉडॅ मॅ बलात्कार कॅल्यात? कॉड्या लोकोंर मॅ बळजबरी केले आन कॉड्या लॉकांना मॅ दुखविलॅ? गा मॅ जन्मा आलॉ तॉ माव अपराध हाय? तॉ अपराध हायदॅ तॅ तॉ माव नाय. तुला मा जीवन खपविता ये नायदॅ तॅ मॅ खपवॉ गा? माला यातनॅ होडव. माला न्याय दे. बास”

सल! बनाबाय तू माआ आयकॉन घॅटला आतॅ माव जीव हॅवसॉ दॉख जालॉ. आतॅ माला भारन्या, बायकोट्या, बायल्या, बाय, भावलनी, डॅरानी, वैनी आन जा जा हादेदे ता ता बॉला, माला कय फरक पड्यासॉ नाय. मॅ कडीआ हॉडॉन दिला. बाय माला निंगाला पाय. बजारातनॅ घारा न्यादो कुनॅ शिंगदानॅ घॅटलॅ तॅ कुनॅ तांबडॅ लाडू घॅटलॅ! पन मॅ? मॅ मेथिये लाडू घॅटलॅ. जरा कमरॅला बरॅ गा आन मान्याला बरॅ! तॅ लाडू तुला ठोईतॅ.

आला बी कय नाय पन पोरां हाता लाव्या मनून हाडलॅ. बॅहॅ तू. मला यॅ जकलॅ लॉखंडाय वॅव्हार हॉत नाय गा आन मा बळॅ आतॅ यो ऐनायो गाठी फॉडवात नाय. सल. आतॅ ऑ निंगालॉ तॉ नाळ्यात खाटका दरी वळनॅ गा आन पावशेर हागुती भाजी घॅवॉन सोपट घारा जायनॅ. आज पोरीऑ शाळीसॉ पयलॉ दी. तिला हमदाव्या लागॅदॅ. त्या पायी माला हप्पे रात निजूस नाय! घारा गेल्योर शेवतूनॅ पुना हजार सवाल कऱ्यात तॅ निराळॅ! नातॅ घारा उहूर जालॉ भगून “डाळडिऱ्यानॅ राब कॅलॉ आन पानी अवारखंड्या गेलॅा” अही कय तरी ती हारवाहारव करदॅ आन मायी बोलती ती बंद करदॅ. अहॉ ऑ सब्बान वॅव्हार हाय. माला कुहुन्यास बाजून हादवॉन देत नाय. दोन घडीव डाव तॅला जीवन ई नाव. आज पावमोड्यो कऱ्यात. बऱ्यो जॅ जाल्यो तॅ धिती येनॅ.

# माटुंग्या गेलो रे! -- आयवन क्रास्टो, उमराळा

माआ जीबेओर एक दोन सव जरा घनॅस हात. कडे जाऑन खासा हांगीला गा माआ जिबेला शार पाय फुटात्यात. माटुंग्याशा रामा नायकशा श्री- कृष्णा बोर्डिंगशा केळीआ पानोरशी पंगत बऱ्यास दिहापासून माआ मनामिने मांडे मोडतोती. पन घारा हांग्या गॅला गा टांग्या गॅला, भगून मॅ मूग गिळॉन भॅलतॉ. तुला खासास पडलॅ, ई आयक्यापेक्षा मूग गिळलॅलॅ कय वाईट नाय!

पन योग जुळॉन आलॉ. आमशा मंडळीआस कय काम तडे निंगाला, अन् आमे माटुंग्याला पोसले. जा किडूक मिडूक काम हॉता ता कय जाला नाय, जिव्यासा टाइम जालता. मॅ इला सुशविला अडे एक खानावळ हाय. तुला सलदे गा! सलदॅ. शोदीत शोदीत निगाले.

रामा नायक शा बिल्डिंगशा पुडॅ पोसले. पयल्या माळयोर हाय! कय हरकत नाय! पायरीओर सड्या सूरवात केली आन माई भूक कॉकल्या लागली. भूक लागली गा माला कईस सुशॅ नाय. कॉरिडोरमीनॅ दोन शार महाने ऊबी होते. माला वाटला, आतॅ जाला, अडे गर्दी हाय ! आन आपलॉ नंबर यादो वखत लागॅ. आमे लाईन मिनॅ उबी रेले तॅ आमशा पुडसॉ पॅपरामिनॅ खिरलॉतॉ. ऑ फुकटसॉ पेपर रामा नायक नॅ ज्याई भूक जाम कॉकलातॅ तॅना सबुर कऱ्यादो ठोईले आहा माला वाटला. मॅ पन डॉळॅ त्या पॅपरात घुसव्यासॉ प्रयत्न कॅलॉ, पन जॅनॅ तॉ धरलॉतॉ, तॉ माला कय वासॉन दे नाय. मंग का कऱ्यासा?

अडे तडे बगीला आन सरळ तॅआ महानाला विसारला, क्या आप रांग मे हो? तॅनॅ, मावर आहा कय बगीला ना की जनू मॅ मांडवात अयेरा पाकीट न घॅता जिव्यादो आलॅ. ‘नही, मैं कतार मे नही हू. अखबार पढने आया हू.’ च्यामारी, खानावळीत कुन पेपर वाश्याआ जातेआ. पन जही माला खाशी भूक लागले तही तॅला शब्दाई भूक लागले हायदे. आपल्यातॅ का करॅ? म्हंजॅ लाईन नाय. आमे आतमीनॅ घुसले. ऑड्यात, तॉ नायकूस बवतेक, काऊंटर वर भॅलतॉ. आमाला बगिला आन तॅनॅ सरळ हात धॉया हांगीलॅ.. अरे, ई का फालतूगिरी हाय.

हात धॉन आतॅपोत फक्त ॲकास महाना भला जालॅ, तॉ मींजॅ पोंती पिलात... तरीपन वाद नाका भगुन आमे हात धॉऑन आले. कुपन घॅतला, आन हांगिलेल्या टेबलोर जावॉन भेले.

बारकासा, दोन जन भॅंदयात ऑडास टेबल.. का कऱ्यासा रॅ यांना? जरा भॉटा घॅतलॉसा तॅ का जालोसा?  तॅआ टेबलोर दोन केळीए पाने आन दोन दोन वाट्यो मांडॉन ठूईलत्यो.  पानोर बगीला, वाट्योर बगिला आन मंग मंडीळीओर बगिला, एक मस्त स्माइल दिला.. पॉसलॉ ॲकदासॉ अडे.. आतॅ मॅ आन रामा नायक. हॉवॉन जाउदे!

आमे भेल्याव बास, तॉ शार पास वाढपी एकदम टॅबलामॅरॅ जमा जालॅ, ॲकानॅ दइ कप ठोईला, ॲकानॅ फरसबी भाजी पानात वाडली, दुहऱ्यानॅ नाळा हिऱ्यामिंशी बटाट्याई भाजी ठोईली, मसुरी भाजी, पापड लॉंसा, मीठा.. आतॅ ई क्याबरबर खासा.. कुपाऱ्याव नेहमीसॉ प्रश्न? मॅ हात घायलॉ, जराक जराक भाज्यो साकॉन बगील्यो. दोन पापड तोडलॅ. आमशी ई माओर बगितॅ.. याला कऱ्यासा का? जकल्या ठिकानी हारकॉस.. मातॅ का करॅ? ईला का वाटातॅ ता वाटोंदे. आज, हम किसकी नही ऐकेंगे.

आली सपाती आली, पुऱ्यो आल्यो, मागो माग सांबार, रसम, ताक आला.  अरे, अजून कय बाकी हाय गा? तव एक जन गॉडाऑ परकार घॅवॉन पुडॅ ऊबॉ रॅलॉ. त्यामिनॅ गुलाब जामुन, गाजर हळवॉ, बासुंदी, खीर, श्रीखंड, रसगुल्ला ऑडॅ परकार हॉतॅ..

किती घ्याशॅ रे.? माॲ डॉळॅ फिरलॅ. सिर्फ एक लेओ! आकाशवानी जाली. शॅ! मजा नाय ! आतॅ का घॅव.. इला हांगिला, तू श्रीखंड घॅ. मॅ रसगुल्लॉ घॅतॅ.. तिनॅ माकुन माओर बगीला आन.. याला का कऱ्यासा रे?  कय कर नाका ! घॅ बास..

एक  फुलका झाला, एक पुरी झाली.. हा हा करता करता पांस फुलकॅ आन शार पुऱ्यो पॉटात गेल्यो. पापडाऑ तॅ हिशेब नाय. कईस कळला नाय.. अजून येवोंदे.

अरे! धान जिवॅ गा नाय.. इनॅ मिनॅस कान साविलॉ.. तॅ वाढनारॅ थांबलॉतॅ.. मॅ इला हळूस बोयलॉ ता घॅऑ गनी. एक शेवटशी पूरी खातॅ.. मन भरला नाय अजून.. वाढप्याला डॉळॉ मारलॉ.. तुम देना बस, त्यानॅ का माईत, दोन पुरयो पानात टाकील्यो.. अरे अरे! एकच चाईये था.. अब असू दे! भाज्यो येतोत्यो आन खपात्योत्यो, कडे जात्योत्यो त्याव हिसाब नाय ! शेवटशो दोन पूरयो दडपिल्यो आन बगीला  तॅ पान जकला साफ सुफ.. तॅआ

पानामिन्नॅ टेबल पन डॉक्याआ लागला. वाट बगीत भॅए तव ॲका मागोमाग परत आलॅ, जकलॅ परकार कय पानात टाक्या हांगील नाय, पन सांबार, मसुरी भाजी आनी धानाऑ ऑ डोंगर. तॉ वाडतॉतॉ आन मॅ बगितॉतॉ! बाजूला कुन तरी जाम सावकाश, अगदी फॉरेनेर कॉहॉ जिवतॅ तहा जिवतॉता.. माईस मंडळी.. होंदे.. तिला तहा जिव्या आवडातॅ अन् माला अहा. धानोर पैला दइ वाळला, मंग मसुरी भाजी.. कालविला, आन सुरु कॅला दडप्यादो.. मिने मिने सांबार पन वाळतोतॉ. खपला एकदासा.. थॉडा अजुन मागॉ गा का? नाका ! इ माऱ्या काडदे.. एक मस्त ढक्कर आलॉ. पावती मिळाली. माऑ ढक्कर आयकॉन नायक आन तॅय वाढपी पन हाया लागलॅ. माला वाटला तॅई, दोनदा हुश्श पन कॅला. माय पैशॅ वसूल.. गॉडॉ परकार मॅ कय खालॉ नाय.. जागास नोती.

हात धुईलॅ, कइस तॅल नाय हाताला, हात धॉयादो हाबुई पन गरज लागली नाय. पायरीओरनॅ उतऱ्यादो मात्र माय फॅरॅ फिरलॅ. सरळ टॅक्सीनॅ निगाले.

माटुंग्यातनॅ, दादर अहा करीत, विरार ट्रेन पकडली. इला हंगिला आपला स्टेशन आला गा उठव.. ई हाया लागली.. समाधानानॅ मावोर बगॉन ईनॅ मस्त स्माइल दिला.. ता शेवटसा खाल्ला, अन् तॉ जॉ मॅ निजलॉ तॉ वसय आला आन जाग आली..

अही नीज इंडियन रेल्वे शा ट्रेनमिनॅ येतॅ म्हंजॅ मॅ खरस सुखी हाय.. तॅआ रामा नायकशॅ मनातशा मनामिनॅ आबार मानलॅ.

# मरसू दादय -- बावतीस पेडीकर, नंदाखाल.

अर्नाळा आगाय तॅ नाळा निर्मळ यामिनॅ आमसा उंबरगोठन नाका हाय, तडे हनुमान मंदिर हाय, जडे दर वहरा आपल्या पवित्र आठोड्यात गुड फ्रायडेआ मागॅ पुडॅ हनुमान जयंती जत्रा भरातॅ. आमी जकले तॅआ जत्रेला जाशे, सनॅ कुरमुरे डाळ खजूर खादो आन हुआसॉ रस प्यादो. तॅआ जत्रेमिनॅ बी खूब खादो प्यादो आन खेळने तन खूब अहॅशे.

मॅ आमशा गावशा फरश्याहरी जासॉ, फरश्या नाना एकदम सज्जन माहनू, पापभीरु. आमशा मॅरदॅरशा पंदरा-वीस गावात जकल्यात भॉठा घर फरश्याआ पन तॅआ वाट्याला एक लानी ओहरी आल्ती, ओहरीला आनखीन लानी ओहरी. तॅआ दोन भाहाशा मिनॅ कारवी कुड. तडेस सूल, पानी ठॉअॅदो लाकुडाई पालतेरी. रातसा जीवान जाला भांडे कुंडे साफ जाले गा तॅआस जागेओर निजादो सोय करॅशी.

फरश्या काका म्हंजे जकले तॅला नाना हाक माऱ्याशे. तॅइ बायकु मरसु दादय, जकल्या गावाशी मरसू दादय. आख्ख्या भॉठ्या घरात ८०-९० जन रेतोते, दुमा शेट कारभारी. तॅआ दरी खूब जागा जमीन होती. दुदाव धंदॉ हॉतॉ. तॅआ गॉठ्यात पास स भैयी होत्यो. दोन कनगॅ घरसा भात हॉता. त्यादरी बैलाइ जोडी होती. गाडा हटॉ, गाडली पन होती. आगाय पासून गाहा भिगाव पोत जादो यादो ते गाडली वापऱ्याशे. त्यादरी खूब केळीइ जागा होती. राटाला बैल जुफॉन तॉ पानी केळी जागेत न्यासॉ. केळी, पपई, भाजी, सवळी, मेथी, वांगे, मिरशी, हळद, आळू खूब कय कऱ्याशे. गावड्या पॅंडॉ गवत, नाय ते सुली लाकूड, किटॉ हाडयाशे. त्याकरता नाना त्याबरबर जासॉ.

दुमाशेट मनानॅ भॉळॉ हॉतॉ. कुना अड परसंगाला मदत कऱ्यासॉ. तॅआ बैला जोडी, नांगरणी, चिखल, आवनी कापनी, मळनी करॅदो, गिरनीत भात दळॅदो तॉ कतॅ नाय बॉल्यासॉ नाय. ऑबडा भॉठा घर, ओट्योर दोन हींदाळॅ, दोन माश्यो, दोन उखळी आन मिनेमास एक पॉलिश दगड, पापड कुट्यादो. घरात भित नोतीस. दोन मेडीला हुंबाई दोरी बांदॉन, त्योर

जुना लुगडा नातॅ पोन्या टाकॉन खोली कऱ्याशी. आज फरश्या नाना आन मरसू दादय ऐंशी पुडॅ गेल्यात. आज तॅंओ रुबाब बगीलॉ गा वाटातॅ कय वहरा पुडनॅ याइ परिस्थीती कही होती.

अॅका भॉठ्या घरात एक लानी ओहरी, तॅत ये नवराबायकू, तीन पोऱ्यो आन दोन पॉर. कितीतरी वहरे त्यामिनॅ रेले, का खाला का पिला, कहे निजले उठले, काहा जीवन जगले, योर चिंतन कॅला पाय.

मरसुदादय, एकदम भोळी भाबडी. तिला कतॅ रिकामा भॅव्यासा नाय. ती कय ना कय करतीस रॅंशी. तीस-शाळीस वहरा पुडनॅ, मंडप डेकोरेटर, केटरर्स, कयीस नॉता. गावाशे लोक याशे आन मांडव घाल्याशे, त्याकरता हावळ्यो लगाश्यो. मरसू दादयला हांगीला गा ती हावळ्यो विनॉन ठव्याशी. कारवी भारॉ घॅऑन ठव्यशी. सयपाक मटन करॅदो मशाद तडसॉ धोंडू काका यासॉ. मंग मरसुदादय लहन हॉकलॉन द्याशी, मटन कापॉन धऑन द्याशी, बटाटे काप्याशे, जक्ला ती मदत करॅशी पन मटन सूप प्यादो बी कुन तरी. तिला कून द्यासा नाय. पन तिला तॅआ कय वाटॅसा पन नाय. मरसू दादय दरी खूब कला होत्यो. नाळाहीरा काडॉन दॉदाल रॅवाळा करॅशी. खापच्यो, सॉमट्यो करॅशी,

वाला गॉळॅत वांगे बटाटे घालॉन त्यामीनॅ हाकर घालॅशी मंग का भाजी लागॅशी. सावळा पिठात गॉड घालॉन पानगॉ करॅशी. रातसा धान, नायतॅ कुनॅ दिलॅ हायदे ता धान हळद मसालॉ मीठ घालॉन फोडनीओर गरमागरम करॉन द्याशी. गावात कुना घारा पॅठ, आहुरॉ करॅसॉ हायदॅ तॅ पयला वारना मरसू दादय. करज्यो, हिंगळ्यो, नातॅ वडॅ रोट्यो, ती जकल्या कामात वस्ताद होती. त्यापायान तिला आन तीआ पॉरांना जकल्यो वस्तू खा मिळॅश्यो. जुन्या काळात पलंग तन कय नॉता. लाकुडाई खाट, शारपायी, मंग तॅला हुंब लागॅसा.

मरसू दादय नाळाये हाले कुटॉन बावखलात भिजात घालॅशी, मंग ते हाले कुटॉन काथॉ तयार करॅशी आन हूंब बनवॅशी, नाळा हावळ्यायो काड्यो काडॉन हालतॅ तयार करॅशी. हुंबाला जक आलॉ पाय भगुन नाना ला हांगॉन खुटे करॉन हाड्या हांग्याशी. तॅआ दॉगा दरी खूब कला होत्यो. फरशा नानाला तीन पोऱ्यों आन दोन पॉर.

मरसू दादय रॉज खपती न खापती. आखो दी काम करॅशी. बाळती वेदना कते हॉयाशो आन भॉठ्या घरशी मरिबय कतॅ याशी, ती हुईन सुईन होती, हाकोबोटे बायीओर बातमी, मरसू बाळत जाली आन् पोरी जाली, पॉर जाला, जक्ला घरात आन तासुदा काळोखात, मरी बय ततॅआ कामात एकदम एक्स्पर्ट होती. शाली, वेरॉन,लीला, इनुस आन मिंगेल. पास पॉराये बाळंतपन घरास जाले. त्या काळात कॉन्व्हेन्ट मीनॅ बेबी शिश्टर फुकाट बाळतपन करॅशी. पन मरसू जक्ला घारा. देव नेहमी तॅआ पाठीशी अहॅसॉ.

तॅई परिस्थिती बगॉन शिश्टर लिओबा नॅ मदर हेमाला हांगॉन तॅइ एक लानी पोरी लीला, कॉन्व्हेन्ट मीनॅ निली. तीआ खाना पॅना कपडेलत्ते, रॅसा जक्ला शिश्टरनॅ कॅला. संत जेमशा शाळीत ती मॅट्रिक जाली. बनारसला गेली शिश्टर जाली.

मरसू दादय आन फरश्या नाना गरीब होते, खूब कष्ट करॅशे, पन पॉरांना शाळीत धाड्याशे, वाझ फादर, भंडारी फादर तॅना फी माफ करॅशे, शाली मॅट्रिक जाली आन झेड पी शाळीत मास्तरन जाली. आगायशा पिटर बरबर तीआ लगीन जाला, ताहास वॅरॉन बी कॉम जाली आन ती कॅथोलिक बॅंकेत नोकरी करतॅ, तडेस तीइ ओळख गाहासॉ जॉन बरबर जाली. दॉगा लगीन जाला आन ते जकले आज सुखात हात.

पॉर इनुस मॅट्रिक नापास जालॉ मंग बोईसरला ॲका कंपनीत कामाला लागलॉ, तॉडॉस हाथ भार्, ईनुससा वय जाला. पन शाली, वॅरॉन दॉगाय लग्ने, बाळंतपन तॅआ पायान ऑबाडा कर्ज जालता. शेवटी ॲपातॅपा मांगॉन एकदासॉ इनुस वराडलॉ. आन मिगेल, शाळीमिनॅ जकल्यात मागॅ, पन खटपटी लटपटी करॅदो जकल्यात पुडॅ. तॉ जेमतेम दहावी पास जालॉ. कूनॅतरी हांगीला आन हॉटेल मॅनेजमेंट कोर्स कॅलॉ आन ॲका शिपिंग कंपनीत नोकरी शोदीताना थॉडॅ पैशॅ पावोतॅ तॅ तॅआ गावश्या अन्नानॅ दिलॅ. तॉ बोटीओर गॅलॉ.

सात आठ ट्रीप जाल्यो, हातात खूब पैसॉ आलॉ. मिंगेलनॅ पयला जक्ला कर्ज फेडला, मंगुस लगीन जॉरात कॅला. मंग रस्त्याला लागॉन सात गुंठॅ जागा होती. ती नाना वाट्याला आलेली तडॅ घर बांदयाकरता खटपट सुरू जाली. पन नाना-दादय नॅ मिंगेलला हांगिला की तू इनूसला वॅगळा टाकॉ नाका. मिंगेल त्यापेक्षा भारी निगालॉ. बायकुला न

जुमानता तॅआ कुटुंबाश्या जाग्योर दोन बंगलॅ बांदीलॅ. एक इनुस करता आन एक मिंगेल करता. दोन बंगल्यात नाना दादय करता स्पेशल खोल्यो, तॅत जक्लि सोय.

ॲका बंगल्या आशीर्वाद फादर अँड्र्यू आन फित नानाने कापिली तर दूहऱ्या बंगल्या आशीर्वाद फादर सालोमन आणि फित मरसू दादय हस्ते कापीली. मिंगेलनॅ नानादादयला काश्मीरला, दिल्ली, कलकत्ता मैसूर, बंगलोर, उटी फिरॅ निला, शिश्टर लीला दरी बिहार बनारस ऑबड्या वॅळा नॅऑन हाडला. विमानात बॅहॉन युरोप, रोम पॅरिस, ताहास सिंगापूर, मलेशिया, इस्त्रायल नॅऑन हाडला. दर तीन वहरा ते वेलांकनीला जात्यात. तासुद्धा विमानानॅ.

एकदम परिस्थिती बदलली, शिश्टर लीला बिहारला रांची प्रोविंशियाल जाले. फरश्या नानाला नवटाक दारू मिळात नोती, मंग कुना कय काम करॅसा आन मंग नवटाक पावशेर प्याशी.

आज फरश्या नाना दोनू घारा तॅला रेड लेबल, ब्लॅक लेबल, सिवास स्कॉच व्हिस्की प्यादो मिळातॅ. मरसू दादय, जुने  लुगडे नॅहॅशी. आज तीआ कबाडात शार पास डजान साड्यो हात. आज तीआ दरी का नाय. फक्त तीआ दोन मांडीआ ऑपरेशन जालॅ पन बी कय त्रास नाय.

फरश्या नाना आन मरसू दादय रॉज देवळा जात्यात. ते अजून जुन्यो आठोनी बाहाले नाय. कुनालाही ते रिकाम्या हातानॅ परत धाडीत नाय. फादर शिश्टरला खूब देत्यात. मिंगेल दरी आन ईनूस दरी एकेक  भोठी मोटर सायकल आन स्कूटर हायुस. पन परवा दिहा मिंगेल सॉ पन्नासवॉ  वाड दि हॉतॉ, जाम बोठी पार्टी जाली. मिंगेलनॅ दोन कार, एक तॅआ करता आन एक इनूस करता हाडल्यो. जकले विसारात पडले. तॅनॅ विराडा-नाळाहॉपारा दुकाने घेटल्यात, वाडा, बोईसरला जागा-जमीन पन घेटले अहि बातमी पन हाय. काय ही हिकवन आन संस्कार. ते नेहमी फादर शिश्टर शे नावे घेत्यात. देवाशी ईच्छा हायदे तर तो  कयी करू शकातॅ..

जकल्यांना नाताळ हनायो खुब खूब शुभेछा.

# बदलती सृष्टी, आमशी द्रुष्टी – जोज्या तुसकान, गाहा

**करॅ पासू काका, समदा बदालला बग !**

आपलॉ समाज पार बदलॉन गॅलॉ बग. आतॅ समाज्यात पैसॉ आलॅ. एकेक गाडयो का, आंगळ्यात शार शार गाडयो का, कय विसरॉस नाका. आतॅ तुआस बग ना, तु आंगोर, डाग पडलेले शड्डी-गंजीफ्राक घालॉन लॉकाआ वाडीशॅ (सॉरॉन) खॉलॅ काप्यासॉ आन मुंबय घॅऑन जासॉ. (त्योरनेस नाय गा, मॅ 'वाय दिस खोल्यावरी.. खोल्यावरी.. ऑ गानॉ लीविलतॉ, आठवातॅ गा) आतॅ तुऑ रुबाब का बगॅसॉ. डोख्योर पांडी टोपी का, (अद्न्ये मद्न्ये आपल्या पॉराई कॅलॅल्या कार्यक्रमात तु, लाल-तांबडी टोपी घालॉन मिरवाता, ता वायला) इस्तरीआ कामिज आन घडी न मॉडलॅला पोन्या. बापा... बापा... करॅ, का सॉबाता तु. भगुनुस हांगातॅ, जक्ला बदालला बग.

पान मॅ का हांगातॅ, अॅ हॅताभाटात बांदीलॅलॅ बॉठ्ठं बॉठ्ठं बंगलॅ आज ओशिक पडलॅलॅ दिखातॅत. करॅ पासूकाका, एकतर या बंगल्यात कुनुस नाहातॅ कारान पोरेबाळे हिकॉन बार नोकरीला जात्यात आन मंग तडेस रॅत्यात. डोकरे दादी-बाबा आहातॅत-नाहातॅत. आन जडे कुटुंबे हात, तडे बय-बाबाई सोय जिन्याखाला केलेली आहातॅ. बिशारे पोरेपारे कामदंद्यात ओबडे गुतलेले आहातॅत गा घर बांदताना आपल्या डॉकऱ्या बय-बाबाला वायली खोली काड्यादो भाहॉन जात्यात बग, का करॅसा ?

पयले आपले कुटूमे नोकरी आन हेतीओर सलॅशे. आतॅ आपले पोरे वॅगवॅगळ्या दंध्यात पडल्यात. बिल्डिंग लाइनमीनॅ कॉडॅ जन पूडॅ आल्यात. कॅटरिंग मीनॅ पन आपलॅ तरून पूडॅ हात, तॅ आपल्या लॉकाआ तॉंडाय सव पुरवीतॅत. तॅन्ना सवीआ शायनीज-फायनीज खा घालतॅत. पान पासूकाका, माला आहा वाटातॅ गा आपल्या पॉरांइ खान्या-पेन्योर लक्ष दिला पाय. या लान्या-लान्या पॉरांये पोटे पूडॅ आलेले बगिले गा बरा नाय वाटॅ. लानपनी औश्येदाऑडा खाला ना, मंग भॉटेपनी जिव्याओडे ऑखांदे खा नाय लागात, इ ते हुमजॉन नाय घॅत. करॅ, आपल्या वखतासा ता तिखाट हुक्क्या बुंबला जिवान, डोंगरशी मावटी, वाला गॉळॅइ भाजी नुसता नाव काडला तरी तॉंडाला पानी हुटातॅ. आतॅय पोरे तॅला 'बुलशीट' बॉलातॅत आन रस्त्योरसा पॉट फूटॅ पोत खातॅत. का करॅसा हांगू ?

तहे आपले पोरे हिकॉन बॅताम पूडॅ गेल्यात, इ बाकी खरा हा. जगाशा जकल्या देशात आपले पोरे काम करत्यात बग. अडे जे हात ते पन कय कमी नात. परतेक गावागावात हीरॅमानकॅ हात. आपले पोरे खॅळात पूडॅ हात. कलावंत कॉडॅ हात. समाजसेवा करॅदो पन पूडॅ हात. लेखक-कवी तॅ वीसरॉस नाका. गर्दीत दगड मारलॉ आन जॅला लागलॉ तॅला विसारला तॅ, तॉ नातॅ ती हांगेदॅ ‘मॅ लिवीतॅ’. करॅ, तुला माइती हायदॅसू, पैसॉ बक्काळ जाल्यानॅ आपला लोक बार इजरायला तीर्थयात्रेला जातॅत. यात्रा पवित्रभूमीइ करतॅत आन ‘तीर्थ’ मात्र ड्यूटी फ्री मीनसा घॅत्यात. आतॅ विकास बोयलॉ मीनजॅ तॉ अहॉ पन हॉतॅ बग.

**आहा पन एक जॉड्पा**

डॉकरॉ- डोकरी बंगलॅआ व्हरांडॅत भेलते आन वार्ता करतोते. मॅ रस्त्योरनॅस हाळी दिली तॅ माला आतलॅंगास बोलविला. आला-अळशी घायलॅलॉ गरमागराम शा दिलॉ. तॅये दोनू पॉर बार हात. पोरीआ लगीन हॉवॉन ती हाऱ्या गेलती. दोगे एकटेशे एकटे पडलॅत.

तॅंना बरा वाटला पाय भगून मॅ बोयलॉ, ‘काको-काकय आतॅ टाइम बदालला. ऑडॉ भॉठॉ बंगलॉ, पोरे-बाळे पन तुमी एकटे पडल्या. बरा नाय वाटॅ.’

‘ताहा कय नाय,’ काका बोयलॉ. ‘आमी दोगी एकदम सुशेगात हाव. पॉरा-बाळाई रगाजळ नाय. हाकोटे देवळा जात्याव. हांशी आयमेरी रोजरी करत्याव. पाय तिगाळा उठातॅव. पाय तिगाळा निजातॅव. नाटक-पिच्चर बगीतॅव दोगी लागॉन सयपाक करत्याव आन कंटाळॉ आलॉ गा बार जाऑन जिवीतॅव. काकयनॅ हावॉनूस काकाला सात दिली. हांगातॅ, ’पोरेबाळे तडे सुकी हात ना, मंग जाला ! बी का पाय आपलॅला. काकाआ पेन्शन येतॅ त्योर आमसा मस्त भागातॅ. काकाऑ फंड आलतॉ तॉ बॅंकेत ठविलॅ त्योर व्याज येतॅ ता वॅगळा. पॉरा या डॉकारपनात अजून बी कुहना सुक पाय आमाला.?’

मॅ दॉगांना नमस्कार करॉन निंगालॉ.

**आमशा सोरगीय बापा**

परमीशर बापा, तूआ राज्य जकल्या दुनियेत पसरॉ. तू जरी सर्गात रॅत अहलॉ तरी तू आमसॉ जकल्यात भॉठॉ बाप हा. कुटुंबात बाबा आहातॅ. तहॉस तू जगासॉ वडील माहनू , नाय गा. सर्गात तूऑ जहॉ शांतीऑ कारबार सलातॅ, तॉहॉस तूये अजान लेकरे रॅतॅत तॅआ पृथ्वीओर पन सलोंदे. तॅआबनी तू आमाला सुबुद्धी दे. सॉरगाहारकी परिस्थिति आमशा पृथ्वीओर आली तॅ आमशा जकल्या जाम बरा हॉयदॅ. आमी जकले सुशेगात रॅनॅव.

परमेसरा, आमाला पॉटापान्या पुरता मिळाला गा बास जाला. आमाला जास्ती हाव नाईस. मर मर मरॅसा आन ऑबडा जमवॉन ठवॅसा, तॅव का ऊपेगु ? शेवटी शरीर मातीतुस जासा ना ! तॅआबनी अडेस जरा मजेत दी घालवीलॅलॅ तॅ का वाईटू.?

तुआ पॉराला माहना रूपात , तु अडे धाड्लोता आन आमाला ‘प्रेम-दया-शांती’ ऑ संदेस दॅऑन तॅनॅ जग्यादो हांगीला. आमी आमशा सुकलॅल्या (जुन्या विसाराआ) आयबापांना, रागा-रागी करनाऱ्या नवऱ्याला नातॅ बायकूला, बिगाडलॅल्या पॉरांना, जळनाऱ्या नातॅवाईकांना, बदनामी करनाऱ्या

मित्रमंडळींना, भागाऑ कांडॉ फोडलेल्या मॅरदॅरशांना पयली शमा केली पाय. मंगूस तु आमाला शमा करदा, आहा प्रभू येसु ख्रिस्त हिकवॉन गॅलॉ. तॅइ ई हिकवन रॉजशा रॉज पाळॅदो आमाला ताकत आन प्रेरना दे. कारन वैऱ्याला शमा करॅशी मीनजॅ खासा काम थॉडास हाय.

प्रभूनॅ आमाला ई पन हांगीलॅ गा मोह जाम वाईट. तॉ कतॅही सैतानाहारकॉ आपल्या पूडॅ येतॅ आन आपल्या सांगल्या जगन्याई वाट लाईतॅ. मॉहाशे रुपे तरी कोडे.? पैसॉ, बंगलॉ, जमीनजुमला, गाडयो, माहाना सॉबना ऑडास का मोबाईल फोन आन लायकी नसताना वरशी जागा. अहयो बेताम गोष्टी हात, जॅआपासून तु आमाला लाम ठो. आमाला वक्तोर सावद कर आन आदार दे. तॅतनॅस आमशी वायटापासून हुटका हॉयदॅ बग.

परमेशरा ई जक्ला आहास घडॉन दे. तथास्तु.!

# पुना भॅटॅदा गा -- विजु वाझ, दारसेंग

कुनाऑ कुन गॅलॉ ?

कुनाई बेन, कुनाऑ भाआ, कुनाई आय, कुनाऑ बाप, कुनाऑ जावाय, कुनाऑ कुण्यात तर कुनाई भावजय.   ॲका वादळानॅ सत्योनाश कॅलॉ. आयमेरीऑ घाट जालॉ गा मम्मी पप्पा येदयात मनुन वाटयात डॉळॅ घालॉन वाट बगीत्यात बारके. रातशॅ निजव्या लाविल्यात तरु आयबाप कडे हात ? मनुन विसारत्यात लेकरे. दादे मॅ बाळत हॉताना, माला निज लागली तर माला ऊठविदा गा ? आला माआ बाये मॅ तुला नाय ऊठव्या तु आखॉ गाव ऊठवॅ. तीस लेक निंगॉन गेले तॅआ वाटयौर वाट बगीतॅ आय.

कामोरनॅ ॲऑन पायाशे बुट काडताना हाताशी बॅग आनी फळाई पिशवी बाबाआ हातात दिल्योर छाती फुगवॉन पोरोर बघणारॉ तॉ बाप. लग्नाआ कार्यात कुहन्याई अडसनीत कुन्यात हाय ना ? मनुन पॉटभरॉन आपल्या कुन्यातशी वाहवा करणारॉ हाळॉ कुन्यातला शोदीतॅ. जरशी कय दुखला खुपला कय गरज लागली तॅ आपल्या ताईआ घारा धावणारॉ बंधव.

दादीबाबा हॉडॉन गॅलॅ पन माआ भाआला न कळता कडशी तळणाआ रोटयाई, करजाई, हिंगोळीई वाटनी आली गा पदरात निकवॉन माआ हातात कॉबनारी माई वयनी. शेवटी सुखदुखात आजारात देवळात हपथ घॅवॉन आंगठी घालॉन ॲकमॅकाला शेवट पोत साथ दयाशी आहा हांगनारी जोडी पान तोडली........

दि भरातॅ रात खादो  येतॅ . एक उहिंऔर मॅ डॉखा टेकीतॅ बीई ऊंही रिकामी. मिनॅ निजनारा माआ लेकरु माआ वॅग्यात येताना हात बाजुला टाकीतॅ. रिकामी गादी बगॉन ता माआ वॅग्यात घुसातॅ. हिंदाळ्यात बॅहॉन बापा लक्ष वेहीओर, उताऱ्यात ऊबी रेल्येला आयशी नंदार वेहीओर, खिडकितनॅ त्याई / तिई नजार वेहिओर आनू आंगळ्यात खॅळनाऱ्या पॉराई नंदार वेहिओर........

एकुस पुना भॅटॅदा गा.......

# भंगारात विकिलेल्या घराइ कानी - सॅबी परेरा

खिळखिळ्या जालॅल्या एमएटी वरनॅ
भंगारवाळॉ उतारलॉ
जुन्या घरा ओट्योर सडलॉ

तोडीआ अन ईटीआ मिनसॉ सुनॉ खडवॉन बगिलॉ
मेडीला लात मारॉन मजबुती बगिली
दारे-खिडक्यो उगडॉन-मिडकॉन बगिल्यो
बांबूए ढॉसलॉन, रिपारी अन कौले बगिले
माळॉ, जिनॉ, कबाडे, खाट-पलंग, बोरिंग
एकेक जिन्नस बगित गॅलॉ
हातशा सोपडीत लिवीत गेलॉ

मंग आमसॉ बाबा अन भंगारवाळॉ
आमशा बंगल्या हॉलमिनॅ बॅहॅलॅ
शा पेता-पेता लाकूडाव, लॉखांडाव, दगडाव
वॅगवॅगळॉ भाव जालॉ, घासाघीस जाली, सौदॉ ठरलॉ
लिवान-टीपान जाला, बयानॉ घॅवॉन जालॉ
आठ दिहात घराव गठठॉ, मॉकळॉ कऱ्यासॉ ठराव जालॉ

मॅ लिवान-टीपाना कागात टुकॉन बगीला.
तोडीऑ अन ईटीऑ भाव लिवीलॅ पन . . .

त्यावर पॉराई पेन्शीलीनॅ लिविलॅल्या अक्षराव भाव का?
भितीशा बांडीत ठविलॅल्या खॅळण्याव भाव का?
कॉनाडात लिकविलॅल्या खान्याव भाव का?
ओहरीत डकविलॅल्या मावलीआ फुटूऑ भाव का?

दापुडशा मेडीऑ भाव लिवीलॅ पन . . .
त्यामॅरॅ पोरे कुकाबास खेळले त्या आनंदाव भाव का?
पांथाऱ्योर बॅहॉन कॅलॅल्या सुखदुःखा वार्त्याव भाव का?
मेडीओर डकविलॅल्या आहरीत बगॉन बय हॅतॉ पाड्याशी
माळ भरॉन आहरीपुडॅ मानावणाऱ्या बयशा सुखाव भाव का?

दारा-खिडक्याव भाव लिवीलॅ पन . . .
खिडकीतनॅ दिल्या-घॅटल्या धान-कालवानाव भाव का?

खिडकीतनॅ जालेल्या, अन हॉता हॉता रॅलॅल्या हयऱ्याव भाव का?
दाराखॉपा रडात-रडात काढलॅल्या रातीऑ भाव का?
दादा लग्नासा तॉरान हुकलॅ तरी दारालास हाय
त्या आंबोत्यॉ खडलॅल्या तॉरनाव भाव का?

कबाडे, पेटी, अन पेटुल्याव भाव लिवीलॅ पन . . .
पेटुल्याशा तांबड्या लुगड्या वासाव भाव का?
खाटयॉरशा वाकळीआ उबॅऑ भाव का?
एकास ओहरीत दोन जॉडप्यांना एकांत दॅणाऱ्या
पॉपडॅ निंगालॅल्या कारवीआ कुडाव भाव का?

रिपारी अन कौलाव भाव लिवीलॅ पन . . .
कौलातनॅ यॅनाऱ्या निंबरा तिऱ्याव भाव का?
डॉळ्यार्शॅ आहूं काडनाऱ्या गइशा धॅराव भाव का?
हारविलॅल्या जमिनीवर काडलॅल्या कनीऑ भाव का?
घरशा ढॅराए बाळंतपने करनाऱ्या गव्हानीऑ भाव का?

हिंदाळ्याव अन माशीऑ भाव लिवीलॅ पन . . .
माशीआ खालनॅ-वरनॅ यॅनाऱ्या गार वाऱ्याव भाव का?
हिंदाळ्यात गावॉन निज्याशा सुखाव भाव का?
लग्नादो हिंदाळ्यात बोयलॅल्या गान्याव भाव का?
बय मेली तिगाळा डेवरलॅल्या हिंदाळ्या दु:खाव भाव का?

मान्य हाय, घर जुना जालता
छप्पार गळातोता, जमिनीला ऑल येतोता
भीतीला, कुडाला पॉपडॅ आलतॅ
मेडीला, बालाला विवळी लागलोती
पण . . .
ज्यानॅ निंबरात हाईल दिली
पाहाळ्यात ऑळॉ दिलॉ
थंडीत उब दिली
त्या घरा, घरपनाव भाव का?

# ‘दिनार’ सॉ आलॉ पूर... आन नावळीला जालॉ ऊहूर...!

**- ईनास तूस्कानो, गास**

‘शाब्या’ पडलॉ कूवेत रीटर्न. कूवेतवरनॅ येताना बक्काट ‘दिनार’ घॅऑन आल्तॉ. लगीन लावॉन परत तॅला बायकू हॅगाट कूवेतलास जासा हॉता. बय-बाबाई एक खांबाई माडी, मींजॅ ॲकलॉस पुत. गॅल्या रजेत आल्तॉ तीगाळा हॉन्या-नान्यापासून तॅ मांडव कॅटरींग सॉ जक्लॉ बंदोबस्त चोख करॉन गॅल्तॉ. बाज्या वाळ्याऑ तॅ तॅनॅ, होयरा जक्याशा पूडनॅस वहरीबर आदी बयानॉ दॅवॉन ठोईल्तॉ. बाकी रॅलॉ प्रश्न बारकी-सूरकी तयारी करॅसॉ, तॅ तॅआ महाभानॅ ती जवाबदारी घॅथ्लोती. कं नाय घॅदॅ. बरा ईर्शीला शर्टपीस-पॅंटपीस. भारीत्सॉ भारी खाजूर, बदामॅ आन भारी भारी शाकलेट, अत्तरायो बाठ्ल्यो, दर ट्रीप ला शाब्यो तॅदो न सूकता आढ्यासॉ. आन या टायमाला तॅ त्यादो शाब्यानॅ बॉठ्ठॉ कस्नॉ, सूनी (सोनी) गा का हांगात्यात तॅऑ टीवी आढ्लॉतॉ. आशार खाला गा लाशार हव्यास लागातॅ.

थॉडक्यात का ? तॅ शाब्याई लग्नाई तयारी फूल जाल्ती. तॅला धास्ती करॅसा कय काम नॉता. आलॉ गा, भंडारी हांगात्यात तहा ‘पाटावर नूस्ता बोहासां बसं’. शिटी पड्ल्यापासून तॅ तळने काड्यादो, हांज्या-लाग्ल्या पासून तॅ ऊंबराऑ पानी हाड्यापोत, मांडवा दीहा हाडी-सोळी घॅवॉन जानारॅपासून तॅ आयेज नॅनारॅपोत, लग्ना दीहा पासून तॅ सवदीहाश्या दीहा पोत. बरी सात-आठशे ‘दिनार’शी दारू यॅनॅ वाटीली. (१ दिनार = २३० तॅ २३५ ₹) आतॅ ‘दिनार’ ऑड्या करतान बॉल्यासा, कारन याला कतॅ पन वीसारला तॅ या ऊत्तर एकूस. ऑडॅ दिनार अडे खप्लॅ तॉडॅ दिनार तडे खप्लॅ. साळॉ दॅतॉतॉ ‘ईंडीयन’ रुपय पन ‘दिनार’सॉ माज दावड्यासॉ. आपल्यातॅ बी का करॅ ? बिना खूराबाए, पानॉ देतॅ ना ! मंग गपशूप दुव्याशी, आन ऊठताना बी वरती तीआ पाठीत थॉपॉ मारॉन ऊठ्यासा. भाख्डी जाली गा पाग हॉडॉन हॅपाटॉन द्याशी.

पैश्याऑ, सॉरीSSS सॉरी ! ‘दिनार’सॉ हूकाळ ऑथॉ, तॅ लग्ना मीनॅ खर्स पन तॉहॉस कॅल्तॉ. बरॅ शार दीहाशॅ बाजॅ कॅल्तॅ. हॉकरॅनॅ ऊंबराऑ पानी पन बाज्याॲस हाड्लॉ. बापाला पन त्या पैशाऑ माज. हांगातॅ, “सकाळ्या तळ्यातसॉ पानी ऊपॅदॅ, पन मा शाब्याॲ ‘दिनार’ नाय खप्याशॅ.” बय हूक्की हूतेरी. पन आंगोरश्या त्या ‘दूबयश्या‘ हॉन्या डागीनॅमूळॅ तीआ वजान जेमतेम शाळीस-एक कीलो भरदॅ. लग्नादिहा फटांग्ड्याई माळ ओडी बोठ्ठी लाईल्ती, की दॅवळाऑ (मिसाऑ)

शेवटसॉ गानॉ खप्लॉ. बँड वाळ्या एक संगीत वाजवॉन जाला देवळोर, तरी फटांग्ड्याई माळ खप्यासा नाव नॉता.

पास-स संगित वाजवॉन जाले देवळोर. फूटु-शूटींग पन जाला. वीडीयो-ग्राफी पन जाली. (अयली पयली विडीयो शूटींग त्यानॅ गावात हाड्ली. पन त्या वीडीयो शूटींग आन त्याअॅ 'दिनार' या पायॅन लग्नात घोळ पडॅ, ता या 'शेख'ला कडॅ मईत.) देवळोरनॅ नावळ निंग्यासा कय नाव नाय. कूनॅ तरी तॅला जावॉन कानात हांगीला. लवकर सल, जिवने ऊठव्याशे पन हात. तू अडॅस देवळोर उहूर जॅ करदा तॅ कंहा का हव्यासा ? शाब्याअॉ प्रोब्लेम वॅगळॉस ऑथॉ. नावळी पूडॅ नासनारॅ गावात्शॅ तरून पॉर तॅला कय नंद्र्या पडात नॉतॅ. आन नीखळीस न नास्ता-उड्ता नावळ, 'बामना' नावळी घथीन न्याशी तर कही ? हॅबदाड-बॅबदाडाई नावळ थोडीस होथी 'ती'? बॉलॉन सालॉन 'दिनार'वाळ्या शाब्याई नावळ ती..

देवळा नींग्याशा पुड्नॅस यॅनॅ काळॉख्खायॅ पासू पा दाएक 'दिनार' दॅऑन ठोईल्तॅ. देऊळशॅ येताना नावळी पूडॅ पोरे नास्ले पात बघून. पासू आन कंपनीला नीव्या पोत धीर कडॅ ऑथॉ. बकरी मरॅशा पूडनॅस तॅई कॉथळॉ काड्लोतॉ. हॉकरॅई तॅला देवळापोत होड्ला, आन तड्नॅस बस पकडॉन हॉपाऱ्या नींगालॅ बार मीनॅ. मांदरीया ऊंह्या खाऱ्याअॉ कूडकॉ... मंग मांदरीई नीज कदो लागातॅ.. शेब्याई हालत, 'हॉला गॅला पान्याला आन पारवा बॅहला बगीत वाट. अहीस जाली.'

शेवटी ना सल्त्याला तॅनॅ बारके दाअॅक पॉराटॅ कंटाळलोते तॅ, आन शार पास बायको आन पोरयो रेल्त्यो त्यो हरी घेथ्ले, आन बँड मास्तरला 'मार्च-पास्ट'शी खून केली. वराडी मंडळीपेक्षा बाज्यावाळॅस नावळी पूडॅ घनॅ दीखातॉतॅ. नावळ नींगाली बाबा देवळोरनॅ. देवळा गेटपा नावळ येतॅ बास तव 'पासू' अँड कंपनी रीक्षात्नॅ ऊतारली.

पासूअॉ पयलॉस प्रश्न, 'का रॅ, शाब्या. कॉडा वखत दॅवळोर काड्यासॉ रॅ ? लवकर नींगॉ सला. !' तॉ बॉलतॉ हाय तव पास्कोल नावळी पूडॅ गॅलॉ. नवरा-नवरी पूडॅ ऊबी रॅलॉ आन तॅंना सलॉनूस दे नाय. आन वरसा घॅथ्ला... 'आज पासूनSSSSS खप्ला रॅ शॅब्या तूझाSSSSS अठवर पSSSSन'.. साळॉ नावळ पूडॅ जावॉन देस नाय. शाब्या महाभा वैताकलॅला ऑथॉस.. तॅनॅ तॅस रागाअॅ पास्कोल सा गप्साट पकडला आन दीला नावळीया बार ढख्लॉन. साळॅ मूX प्या गॅल्तॅ त्या पायेन नावळ लेट केली. आन अजून बी लेट करॅ लावीलॅ !

पास्कोल सा गप्साट पकडता खोटी, सायमन शेब्याआ महाभाशा आंगोर गॅलॉ. तराड जाल्तॅ जकलॅ, तॅ बॉल्यासा कूनाला. मायकल सॉ पाय जाग्योर पडात पन नॉतॉ. तॅनॅ पन तडनॅ महाभाशा

टाय लास हाथ घायलॉ. टाय कय त्या आथात आली नाय, पन तॉस महाभाश्या आंगोर पड्या गॅलॉ. पन सायमन नॅ वँग्यात पकड्लॉ. तीगू सोगू महाभाश्या आंगाला झूंबलॅ. शेवटी शाब्यास मीनॅ पडलॉ. हॉडवा होडव जाली.

पन एक 'तह' जालॉ. लीडर पासू हांगातॅ शाब्या आमी तूऑ मान ठोईत्याव, पन यॉ तूऑ महाभा हाय, तॅला हांगॅ अडनॅ पासून तॅ हांशी नावळ ओट्योर सड्या पोत आमशा पॉरां मॅरॅ यासा नाय. आन आलॉ तॅ बीना टीकीट तॅआ घारा नवाळ्यात पार्सल धाडलास मनून समाज. (पाय ॲकाऑ पन जाग्योर पडात नॉतॉ मंग बी पार्सल कूनॅ बांद्यासा. पन, कूत्ता अपनी गली मे शेर।) थॉबा-थोबी जाली. तह पन जालॉ. नावळ वाट्याला लाग्ली परत.

नावळ सल्ती हाय तव मॅरनॅ एस्टी बस आली. पास्कोल परत कडनॅ आलॉ आन त्या बसवाळ्या पूडॅ ऊबी रॅलॉ.

एSSSSS बस होपSSS होप. होप मींजॅ होप ! बसवाळ्यानॅ बस ऊबी केली. डायवर भिगावसॉ पीटर हॉथॉ. तॅला पॉरांई साल मईतूस ओथी. पॉराई बस कूट कूट कूटीली. आन शॅवटाला बस सालू जाली परत, तरी पास्कोलसा मन कय भरात नॉता. आंगात हाय ती थोडीस शांत बॅहॉन देतॅ ? पास्कोल नॅ सलत्या बस वर माकून कूट्या लावीला. बस सा पत्रा थॉडा फाटॉन बार आल्ता तॅहॅ त्या आथाला ऑरखाडॉ आलॉ. जूरूखसा रगात पन आला. पन बस थांबवॉन कूटीली त्या पराक्रमा पुडॅ ता रगात कीस झाड की पत्ती.

नावळ एकदाशी मांडवात पोस्ली बाबा. जक्ले पावने नावळी वाट बगीतोते. जीवनाई तयारी पासून तॅ दारूआ काऊंटर पोत सगळी तयारी 'जय्यत'. फक्त केक काप्याशी खोटी. डॉमनिक मास्तर पयलॉस आथात माईक घॅवॉन स्टेजवर "हॅलो हॅलो माईक टेस्टींग १, २, ३ हॅलो हॅलो, करीत नावळीई वाट बगीतॉतॉ. नवरा-नवरी स्टेजवर सडले तवपोत साडेबारा वाजलॅ. आन डॉमनीक मास्तरनॅ राट झुपीलॉ. शेब्या वक्ता शेब्याई बय पास मईन्याई पूर्मुशी (प्रेग्नेन्ट) होथी त्यापासून, तॅ शेब्यो हल नींगूत स्टेज वर सड्लॉ तवपोत. जकला आळू बॅंड घाठॉन जाला. तॅनॅ बरे वीस एक मींटे घाल्वीले तॅत. लॉकाना वाट्ला आतॅ केक कापॅ. पन मास्तरशा आथा माईक आलॅ तॅ मास्तर आयकातॅ ? आंदळ्या नंद्र्या सांद पड्लॅ. मास्तरनॅ शेब्या वाड्ग्या दो (बॉठ्ठॉ बाबा) लजार भेठ्वीली. मंग त्याई डोकरी.... मामरसॉ डॉकरॉ... मामरशी डोकरी... नवरीअॅ डॉकरा-डोक्री... तीया मामरशे... होथॅ नोतॅ तोडे जकले सरगातनॅ स्टेज वर आढ्ले.

अरॅ पन परसंग कूहनॉ हाय? टाईम कॉडा जालॅ? पावने खोटी हात ता, या डॉमनीक मास्तरला कळॅ पाय गनाय. वॅड्या आथात कोलूत... तॅ वॅडॉ नींगालॉ गाव पेट्वीत. शॅवटाला पासू अँड कंपनी कॉपऱ्यात ऊबी ओथी ते वैतागले आन तॅई जॉरजॉरात पापोळ्यो मारॅदो आन आड्ड्या सूरवात केली, तॅ झेट थांब्या तयारूस नात, शेवटी मास्तर समजालॉ आन आवारता घॅथ्ला.'आता मी वधु-वरान्ना विनंती करतो की त्यान्नी केक कापून.....' तीगाळा कडॅ कॉपऱ्यातनॅ टाळ्यो वाज्याशो बंद जाल्यो.

केक काप्लॉ. बार ओपन. जीवने सुरु जाले. वीडीयो शूटींग आन फूट्ू, स्टेजवर सडनारॅआ परतेक माहनाऑ शाब्यानॅ घॅठ्लॉ. तॅत त्या जाम टाईम खोटी जाला. तीन वाजलॅ तव पोत काऊंटर सालू ऑथा. जीवने ऊठता ऊठता साडे शार वाज्लॅ. तॅत बी शाब्याय वसयशॅ खास मीत्र (कुवेत-रीटन) बॅहॅल्तॅ. तॅ हांशॅ पास वाजलॅ तरी दारू प्याशॅ थांबलॅ नात. जिव्यासॉ तॅ पत्तॉस नाय. (VIP ट्रीटमेंट त्यांदो ओथी) शाब्या घडीबर त्यांहरी बॅहलॉ. दोन एक ढखल्लॅ. मंग तॅना हांगातॅ माला सात वास्ता नावळ हाड्या जासा हाय. तूमी अँजॉय करा. मॅ आंग धऑन जरा फ्रेश हवातॅ.

सात वास्ता नवरॉ नींगालॉ नावळ हाड्या. जाताना तीन शार 'बाठ्ल्यो' तॅनॅ बेसमनला हांगॉन बंदोबस्त कॅलॉ. अडे हारोडी मांडवात पोस्ले, हारोडीशी मंडळी बगीतॅ तंव नवरॅआ खीरी वीडीयो शूटींगवाळ्यालास बग्यादो ऊल्टाल्ती. खऱ्या हीस्पाला आपल्या मीनॅ नावळ डॅवताना नवरी घरशॅ शक्यतो नासात नात. लेक डॅव्याशी तॅ सगळ्यान्ना दूख हवातॅ. पन अडे 'पीक्चर' कय वायलास ऑथा. वीडीयो शूटींग सल्ले, तॅ गावशी वेई मंडळीनॅस बगीतॅ तव मांडव अल्लामत आरंगील्तॉ. तॅत नवरीई मावशीपासून तॅ तीया भाआ पोत जक्लेस नाशा घूस्लोते. मांडवात वग कमी पड्लॉ तॅ बी ओट्योर पन खयताळॉ.

या गडबडीत नवरीई तयारी करॅसा कूनाला धॅन्सारूस रॅला नाय. थॉड्या वॅळान बगीतॅ तव पासू अँड कंपनी आली. 'घूमराट' दॉपारसा हॉतास आंगात. तॅत बी बेसमननॅ पासूला बोलवीला, आन ज्या पॉरापा 'बाठ्ल्यो' दील्त्यो तॅऑ पत्तॉ दीलॉ. पास मींनटात मंडळी रिचार्ज हव्वॉन मांडवात "अतीक्रमण". मांडवात घूस्ता खूटी तूमाला हांगॉ धख्खा मूक्की आन नास्ता-नास्ता खालनॅ लाती सूरू जाल्यो. वॅई मंडळी मांडवातनॅ कडनॅ गूल जाली ता कळलास नाय.

पास्कोल नास्ता नास्ता, हाकोबटश्या बसशा स्टाईल मीनॅ बँड मास्तरशा पूडॅ आलॉ. मास्तरSSSS थांबाSSS थांबाSSS थांबाSSS.! मास्तरनॅ कलानी हत्तीया हॉंडी (सोंड) गथीन वरती केली. आन टँ अँ अँअँअँSSSS रीक... बाजे थांबलॅ. मास्तर.. माआ ई गाणा

घ्या...!  (श्यान्या सतूराशा रे पूतरा या गीता सालीवर) गाडकूली ssssss! गाडकूली ssssss ! गाडकू ssssss ली ! नवरीशा बाबाशी आंडकूली ssss  ! वाजवा !!!.वाजवा मास्तर !! आतॅ ई कय गीत जाला गा ? पन बॉलनार कुनाला. ॲकामॅका व्यायांशी टर खॅश्याशी रीतूस आपल्या लग्नात हाय ती.

बारके पॉराटे तरी कय कमी दीहाशे हाथ आ रॅ शाब्या गावशे ? हॉकरॅई मॅरशा फूलशेरी काकाआ गॉठ्यात दोन ॲटम-बॉम  फोड्लॅ. तॅये ढोरे जकले भूर्खाले. तांब्या बैलानॅ तॅ नाथ तॉडॉन जॉ जॉट्टॅ हूटलॉ मॉकळॉ, तॉ ऊबी रॅदो हींवरात्शा राटोर. काकानॅ दोगी तीगी पोरे टूकॉन कानोर आहड्योते  पन परत वीसार कॅलॉ लग्नात खयताळॉ नाका. पावने आठ वाजात आलॅ. शाब्या घडॅळोर बगीतॅ आन मास्तर वर बगीतॅ. नवरीई तयारी जाली बाबा एकदाशी. आतॅ खेमो घ्याशो आन नींग्यासा. पन यायो खेमो कय खपात नात. वीडीयो शूटींग हाय तॅ सगळ्योस बायको खेमो घ्या लागल्यात.

आठदीस पूडनॅ मरी काकय आन व्याईनीनॅ एकी-मेकींयो हेंड्यो ऊस्कील्त्यो, ती मरी काकय पन बगीतॅ तव खॅम घ्याशा लाईनीत ऊबी रेले. दापूडश्या बाल्या काकाआ डोकरीऑ एक पाय खाशा कड्योर हाय. ती बगीतॅ तंव नातीऑ आथ धरॉन डेवनीयोर नॅ सड्या लाग्ले खॅम घ्यादो. बायल्या फराशीं बगीतॅ, तव, तॉ पन खप-खपॅ रडॉन खॅम घ्या लाग्लॅ. पासूनॅ अंदाज घॅथ्लॉ. वीडीयो शूटींगवाळ्या कानात जावॉन कय तरी हांगीता खुटी कॅमॅरॉ मांडवात फीरलॉ आन फोकस बंद जालॉ. तह्यो खेमो बंद जाल्यो. पासूई नक्कल कामाला आली.

बाज्या वाळ्याई ‘बाबूल की दूवाए लेती जा’ गीत घॅथ्ला. आन मांडवातनॅ हेटॅ पाखड्ले. नावळ ऑफीशली नींगाली. पासूवा गाडा हारका-हारका जक्लॉता. तॉरनाऑ बांबू ऊस्क्या गॅलॉ तॅ तॅऑ तडॅ ‘कडेलोटूस’ जालॉ. जेमतेम तॅनॅ तॉ बांबू ऊस्कीलॉ. तॉरान काड्ला आन हतीरोर लाव्या लाग्लॉ तॅ, नवरीया वॅंग्यातूस पड्लॉ.

बॅज्या पॉरानॅ तॅ कमालूस केली. ती कडशी पाईप वेल्डींग करॉन बंदूकी हारकी बॉम पॅटव्यादो केल्ती. तॅतनॅ तॅनॅ बरॅ दाएक बॉम ईश्टाईल मारॉन पॅटवीलॅ. आतॅ पूडश्या बॉमला तॅनॅ वायलीस स्टाईल मारली. बॉम पेटवीलॉ आन एक तंगडा तूकॉन कडी खालनॅ हाथ घायलॉ. बॉम फूट्लॉ,,, ठ्ठो sss! बॉम सरळ, मन्या काकाआ पॅंड्या ऊडव्या मीनॅ. जकल्याई धावपळ. वॅई मंडळीत्शा कूनॅ तरी प्रसंगावधान दावड्ला, आन त्यो दोन तीन पेट्लेल्यो  पावळ्यो ऊडव्यातनॅ

खसकन खेशील्यो, त्योर पाय मारॉन विज्वील्यो. अनर्थ टळलॉ. नाय तॅ ऊडव्याऑ तडेस राब पेट्यॉतॉ.

नावळ पूडॅ सलती हाय. हरान मयन्यात जही पान्याई हर-हाट मिनॅ-मिनॅ येती आहातॅ तहा 'शाऊन' आन 'बाठ्ली' नावळीत मीनॅ-मीनॅ फीरातॉती. नावळीया मॅरनॅ बगीतॅ तव शंभू पाववाळा सायकल आथामीनॅ घॅऑन ट्रिंग-ट्रींग ट्रिंग-ट्रींग करीत रस्तॉ काडीत साल्ला. बेम्ट्याआ पॉरा आंगात कळ कमी, तॅ हॉकरॅनॅ तॅई सायकलुस मांगनॅ धरली. भोजपूरी मींसा, भॉxx पन बॉलता येत नॉता. आन तरी झूंबलॉ तॅला. "एSSS फलन वा ।" "कैसन हो । ईंहा आवा हो ।" "नाही धोई ककडी खाई का ।" "एSSSSS बूx च्योx रूका हो तनीक।"

भय्या बीशारा का बॉल्यासा. हांगातॅ. "ए बबूवा खाली फोकट गालीया काहे बकत हो हमका ? "हम कौनो तकलीफ दीये है का तोहके?" "हमका जाये दो। हमका देर हो गईल बा ।" बेमट्याऑ "लल्लक" ऑलॉ बुंबूल जालॅ तॉ आयकातॅ कदो. "ई लैलो। ईक ठो पैग वा मार लो हो।"- हांगॉन तॅपा शाऊन दीला. ता कय प्यादो तयार नॉता.. "बबूवा हमार धंदा का टाईम है । हमरे साथे ऐसन मजाकवा ना करो हो । तुहार बाबूजीके ऊमर के है हम।" ता नाय करतॅ, तव यॉ हांगातॅ - "हमरे शेब्या भाई का शादी है । तूमका पीयेके पडी।" भय्या कंहा बंहा हुटला. आन यॅनॅ बाज्यावाळॅ नाय गा थांबवीलॅ.

मास्तरला हांगातॅ. - मास्तर ! थांबा थांबा, मा एक हिंदी गाणा वाजवा. "खाना मीलेंगा SSSS पीना मीलेंगा / शाब्याकी शादीमॅ दारू मीलेंगा।"वाजवा ई माआ गीत. कलमेत मीनॅ पड्लॉ, आन हांगातॅ, 'ता कईस नाय मास्तर.....! "नाशीक ढोल" वाजवा. नाशीक मींजॅ नाशीक ढोलूस. वाजवा... वाजवा... ढाम... ढाम... ढाम.... टांन....!टांन....!टांन....! ढमा कडा...! ढमा कडा...! ढमा कडा...! नाशीक ढोल सालू जालॉ. "नाशीक ढोल सालू हॉता खूटी, एखूंद मस्ताड भय हडाला आथ लावीलॉ गा ऊडातॅ कही, तंहॅ जक्लॅ बीड्डा भूजीतानाशा वाला हारकॅ खापरीत ऊड्या लाग्लॅ. दाएक ऊड्यो मारल्यो, आन पासूवा पॉटात मळमळ्या लागला. कॉपरॅत गटारा मॅरॅ जावॉन दोनी आथ डॉख्याला तॅनॅ धरलॅ, आन बतकन खाला बॅहलॉ. पास्कोल जूरूख वॅळान तॅआ मॅरॅ गॅलॉ. तॅला हांगातॅ, 'का रॅ पासू! ता डॉकरॅआ माहना गथीन खाला बॅहॉन का मूताता..! तॅनॅ पासूआ पूडॅ बगीला तॅ, बापरे..! अस्नी बोठ्ठी रांगोळी. तो तॅआ पाठीत दडप्प्या लाग्लॉ. ॲका पॉरा दरनॅ पानी आपवॉन पासूला तॉंड धव्या लाईला. सव्वा नव वाजात आल्तॅ आन, 'दिनार' वाळ्या शाब्याई नावळ अजुन घारा पॉशॅशी हाय.

# बंड्याव जालाँ आप्पा - सिरील मिनेझीस, आगाय

आत्याशा टायमाला जोड्यॅ होशीये पोरे शाळीत जात्यात, तॉड्या होशीये आमशा टायमाला पोरे शाळीत गेलोशे तॅ तॅआ टायमाला आपल्या समाजात गाडाभर इंजीनीअर आन टोपलाभर डाक्टर जालॉशॅ. आन नाक्या नाकॅओर वडापावशे गाडॅ कहँ हआतॅत तहे, आपलॅ डाक्टर आन इंजीनिअरशॅ दुकाने हलोशे. आत्यॅ पॉरांना शाळीत जादो रिक्षा का? बस का? तिगाळा तंगड्यो तोडीत शाळीत जासा आन हातपाय गाळीत घारा यासा. आत्याशा पॉरांव युनिफॉम बगीलॅओर आमाला कुल्योर फाटलॅल्या टुमानीई तिगाळा नाय लाज वाटली, पन ती पँट आठवॉन आज लाज वाटातॅ. आज कालशा पॉराऑ युनिफॉम का हांग्यासॉ ? टाय का ? आन बुट का? आमाला पायात शिलपर सडवॅदो आठवी उजाडलोती, आन दाव्वी हॉयादो किती शिलपरशॅ जोड घालविलॅ तॅ आन बाबाअॅ किती धफाटॅ आन गाळ्यो खाल्यो त्याव हिशोबुस नाय.

पयलीत घायला तिगाळा आमसॉ बंड्या सात वहराव (तिगाळा या वयाला घोड्याई उपमा होती.) हॉतॉ. पयला वहरी पळन्यात गॅला. दुह-या वहरा तॅनॅ पयली गटांगळी पयल्यांदास पयलीतूस खाली. तिह-या वहरा आलूस मास्तरला ऑ दा वहराऑ घॉडॉ पयलीत कॉहॉ ठॉयासॉ? याई लाज वाटली, आन तॅनॅ आमशा बंड्याला "वरच्या वर्गात घेतले". या उपकाराई भिड बंड्यानॅ शेवट पोत ठोयली. तॉ आलू मास्तरसॉ उजवॉ हात जालॉ. मास्तरला चारमिनार, एकशेवीस पान आन गायशाप हाढॉन दॅसा काम आपसुक बंड्योर आला.

फस्ट ईयर, शेकँड इयर करीत, पडात ऊठात आमसॉ बंड्या एकदासॉ सातवीत पॉसलॉ. परिक्षा आली गा तॉ घनॉ खुश हॉयासॉ, तॅला कारन शाळा लवकर हुट्याशी भगुन. इतिहास तॅव आवडतॉ विषय. एकदा तॅनॅ इतिहासावॉ पेपर लिवीताना सात पुरवन्यो घेटलॉत्यो. आन इतिहासात तॅला नॅमकॅ सातूस मार्क मिळ्याशॅ गा ? लोपीस मास्तर हांगात्यॅ,

"बंड्या, पस्तीस पूरवन्यो घॅटलोशे तॅ निदान पास तरी जालॉसॉ."

आमशा या बंड्यायो गमती - जमती का हांग्याशो ? हिंदीऑ मास्तर पाटीलसरनॅ एकदा धडॉ हिकविल्योर, बंड्याला ऊबी करॉन हिकविलॅल्या धड्यासॉ प्रश्न विसारलॉ.

"लेखकने पैसे लेनेसे इन्कार क्यु किया?"

वाये, बंड्यानॅ कालूस भारत टॉकिजला 'इंन्कार' शिनिमा बगीलतॉ बास ! पाटीलसराव पश्नासॉ इंन्कार ऑ शब्द आयकॉन तॅला शिनिमातसॉ, 'मुंगडा 'डांस आठवालॉ, आन तॅनॅ बेधडाक उत्तर दिला,

"हेलन ने डान्स किया इसलिये लेखकने इन्कार किया."

मंग का? पाटीलसरशा आंगात विनोद खन्ना संचारलॉ आन मंग तॅनॅ बंड्याला विलनला काहा मारातॅ तहा कुटीला. पन बंड्याला  मार खाशी हव्वय जालती. तॅआ पायान आमशी हेडमास्तर गिरदरबाई बंड्याला काईमशी बॉल्याशी, "निर्लज्य सदा सुखी."

मराठीत खुब म्हनी हायद्यात, पान बंड्या लक्षात ई एकूस म्हन रेली.

एकदा आठवित इतीहासा पॅपरात एक प्रश्न आलतॉ,

"दुस-या महायुद्दाची कारणे सांगा."

आतॅ खॉटा कादो हांग्यासा ? या प्रश्नाआ उत्तर, ॲका पान पॉरानॅ आन पोरीनॅ लिवीला नाय, जकल्यांने या प्रश्नाला अल्लामत मोकळी जागा हॉडॉन रजा दिली. पान ॲकल्या बंड्यानॅ या उत्तर, उत्तर पत्रीकेत लिवीला. अर्थात ता  वाशिल्योर मास्तरनॅ त्याई उत्तरपुजा घायली. इ  तुमाला वायला हांग्यादो नाका.

आहा का लिविलता बंड्यानॅ? तॅनॅ लिविलता, दुस-या महायुध्दाची कारने पुढीलप्रमाने,

१.चिलखत २.जिरेटोप ३.बिचवा ४.वाघनखे.

इ वाशिलॅओर मास्तरला बंड्याआ जागॅओर अफझलखान दिख्या लागलॉ. आन मास्तरशा  आंगात छत्रपती शिवाजी महाराज  खिरलॉ. शाळा नेमकी हुटली भगुन बरा जाला, नाय तॅ मास्तरनॅ तॅव कॉथळॉस बायार काडलॉसॉ, कारन आमशा मास्तरसा आडनाव पान वाघमारे हॉता. (प्रत्यक्षात तॅआ मास्तरशा आख्या खानदानात कुनॅ उंदूर पान मारलॉ नॉतॉ .)

एकदा आमशा दुबे मास्तरनॅ "छाते की आत्मकथन" ऑहॉ विषय पॉरांना निबंद लिव्या दिलॉ. वर्गात एकशे एक हुशार पोरे, निबंद बोयलेओर जकल्याई हत्री फाटातॅ तही ## फाटली. ॲखाद्यानॅ निबंद लिव्यासॉ आन ऊरलॅल्या जकल्याय त्यायो झेरोक्स  काड्याशी. ऑहॉ अलिखित नियम हॉतॉ. तॅआ पायान मास्तरला निबंदात कय वायला हापाडला नाय. पान बंड्याव निबंद

वासॉन, दुबे मास्तरला हिंदी भाषेई एक तिहरी लिपी हापडली. उर्दु आन हिंदी पलीकडॅ जाऑन  बड्यानॅ नवी कुदिं भाषेऑ शोद लाविलतॉ. निबंदाई सुरुवात बगा......

"मॅ घरमॅ एकलॉ थॉ. सब लोग बाहर फिरनेको गये थे. मेरेको  कंटाळॉ आयो थॉ. इसलिए मॅ खाटेओर पडॅआ थॉ. ऑड्यामे मला कोपरेसे आवाज आयॉ. मॅ देखा तो वो मेरी छत्री बोल रही थी !"

इ जकला मास्तरनॅ वासॉन दावडला तिगाळा जकले आह्या लागले.  पान आज इ आठवाल्योर आपल्या भाषे बद्दल ऑडा प्रेम हणारॉ विद्यार्थी आमशा वरगात हॉतॉ, या माला अभिमानुस वाट्या लागलॉ

आतॅ या बँड्या, पुडॅ जाऑन काहा हॉयासा? ऑ प्रश्न तॅआ आयबाबा पेक्षा तॅआ मास्तरला आन हेडमास्तरला घनॉ पडलॉतॉ. पुडॅ ऑस बंड्या भॉठो बिल्डर जालॉ. तॅला जकले आप्पा हांग्या लागले. अब्यासात कस्सॉ हलॉ भगुन का जाला? व्यव्हारात तॉ अव्वाल हॉतॉ. आतॅ या आप्पाला  बंड्या ह़ाग्याशी कुनाई टाप हाय ?

आप्पाआ ऑफिसशा समोर दोन शा वाल्यो  टप-यो हात. एक अण्णांनी टपरी आन बी नानांनी टपरी. आतॅ माहारकॅ मित्र आप्पा हॉफीसात गेलेओर आप्पा, अण्णा दुकानातनॅ शा मांगवीतॅ . पान आमशॅ  मास्तर आप्पा हॉफिसला गेलेओर तॉ नाना दुकानातनॅ शा मागवितॅ, बिशारॅ मास्तर शाशी वाट बगॉन बगॉन शा न पॅता वळतॅ जातॅत. पान आमशा बंड्याला सॉरी आप्पाला तॅव ना खेद ना खंत.

# बी. टी. क्लब - अँथनी परेरा, नंदाखाल

दॉपारसा जिवान आटपॉन पेदर वडाआ झाडाखाला पारोर सुशॅगाद बॅहॅलतॉ. अजुन पारोर कुन आला नॉता. पेदरनॅ तमखा पिडीतनॅ शिमटीबर तंबक डाव्या तळहाथोर घॅतलॉ. उजव्या हाता आंगठ्या मॅरशा बॉटान्य थॉडॉ सुनॉ डबीतनॅ काडॉन तमखोर घॅथलॉ आन त्यास बॉटाय तमखोर तॉ घविलॉ. एक फूक मारॉन कसरा फुकॉन टाकीला. डाव्या हाताश्या तमखोर उजव्या हाथाई सापटी मारॉन पावडर झटकॉन टाकिली...आन् तमखाई गोळी ऑठाखाला ठवॉन दिली.

दोनी पाय वर घॅवॉन तॉ आरामात बॅहलॉ, हवा मस्त येतोती. आजुबाजुला शांतता होती. मॅरशा निंबा झाडाखाला एक मांजर आंगाआ मुटकुळा करॉन निजलोती. माडोर बॅहलॅलो एक कागुळॉ तॉडॉ काव काव करॉन पेदरला सोबत करतोतॉ. लोकसत्ता पेपर उलटॉ-सुलटॉ करॉन पेदर साळतोतॉ, पिंक टाक्यादॉ तॉ थॉडॉ उठॅ तॅस त्या घरा मॅरसॉ मतेस बडबाड करीत येताना दिखलॉ. मतेसला बडबडात येताना बगॉन पेदरनॅ विसारला, 'कारे मतेस ! आज ऑडा बडबडात, पाय आपटीत आलॉ तॉ? जिवान-बिवान जाला गा नाय?'

'अरॅ, जिवान गॅला सुलीत, तॅआ मायला, बॉल्याशी पान कय सोय नाय!'

'अरॅ, पान जाल्यॅ का ऑडा?'

आरे, पेदर, मॅ दिली एक गाळ मा बायकूला, आन जरा वरश्या आवाजात बोयला तर ती हांगातॅ, ‘ऑ, आवाज खाला. जास्ती आवाज कऱ्यासॉ नाय. भांडान नाय पा. गाव आपलॉ तंटा मुक्त रॅलॉ पाय’.

"मंग बरबर हाय!"

'आरॅ का बरबर हाय? बायकुहरी पन भांड्यासा नाय? अरॅ भाजीई पशेंडी मिंगारा फॅकॉन दॅनार हॉतॉ. पन आमशी ई तंटामुक्त गावमंडळाई सभासद हाय. नुसतास लफडा नाका भगुन दिला समोरसा ताट फॅकॉन आन पडलॉ घराबार'

अरॅ पेदर, घराघरात, गावागावात भांडान कदो पाय? गाव कहॉ एकदम हुता हारकॉ सरळ सलतॉ पाय. भुगूनूस सरकारनॅ तंटामुक्त गाव ई कल्पना हाडलॅ. जॅआ गावात भांडान-तंटॉ नाय तॅआ गावाला बक्षीसपान जाइर कॅलॅ. ई बग पेपरशी बातमी.

अरॅ, जळॉन टाक तुऑ पेपर. तंटा मुक्त गाव पाय हांगातॅ. अरॅ पेदर, तुला हांगातॅ, तॉ आपलॉ आंब्याखालसॉ शिमा हाय ना, त्याई बय तॅआ बायकूला खूप बॉल्याशी. जाम तरास द्याशी. पन

शिमाई बायकू पंचायतशा इलेक्शनमिनॅ निवड्यॉन आली. तिनॅ एक दि तिआ हाऊला दम दॅऑन हांगिला, 'घरात आवाज नाय पा. गाव तंटामुक्त रॅला पाय. नाय तॅ कारवाई करनॅ. तिगाळा पासून तॅआ डोकरीऑ आवाज एकदम बंद जालॅ.

"आरॅ डोकरीला दाब्यासा आन आपुन गावभर मिटींग्यो घॅत फिऱ्यासा. वारे, वा. हांगातॅ तंटामुक्त गाव पाय"

अरॅ मतेस, आतॅ गाव हळू हळू सुदरातॅ. पयल्या हारकॅ गावात भांडान तंट्यॅ हॉत नाय. ई चांगली गोष्ट हाय ना?

अरॅ का चांगली गोष्ट हाय, अरॅ तॉ आमश्या हेतोरसॉ क्रिष्णा परवा हॅत नांगरताना त्या ×××नॅ मा हॅताऑ कांडॉ वॅतभर फॉडलॉ. तॅला विसऱ्या गॅलॉ तॅ का हांगातॅ मतेस, तू कय भांडान कऱ्या आल्या? गाव कहॉ तंटा मुक्त पाय? मिजॅ यानॅ आमशॅ कांडॅ फॉड्याशॅ आन आपुन विसऱ्या गॅला गा तंटामुक्तीआ तुनतुना वाजव्यासा. वा रे वा तंटामुक्त गाव!" माई बायकू त्या तंटामुक्ती मंडळाई सभासद. तिला इ प्रकरन हांगिला तर का हांगातॅ, जाऊंदे ना. का वॅतभर जाग्याकरता भांड्यासा. मग ऑ आमश्योर अन्याय नाय गा? आन् हांगातॅ तंटामुक्त गाव. मॅ तर हांगातॅ ऑ तंटामुक्त गाव नाय, तर अळनी गाव हाय. अरॅ भाजीत काहा परमानात मीठा पाय, ताहा आपल्या गावात परमानात भांडान पन पाय. त्या शिवाय का मजा? नुसता गॉड गॉड बॉल्यासा, आन गॉड गॉड खासा ई कय जीवन हाया. आरॅ जिवनात कतॅ कतॅ मिरचीई फोडनी पान पाय" मग बग कही मजा येतॅ"

आरॅ मंग तुआ मत का, रॉज गावात भांडान जाला पाय आ? ॲकमॅका डॉखा फुटला पाय आ? अरॅ, सरकारसा बरबर हाय, तंटामुक्त गाव जालॉ पाय"

अरॅ, इ जकला मिळमिळीत. आपल्याला नाय इ पसांत. आरॅ, हाउ-ओसा, भाहा-भाहासा, नवरा-बायकुआ भांडान जाला पाय. आरॅ, भांडान जाला गा नंतर आपसात प्रेम वाडातॅ. आरॅ आपून ॲकमॅका अध्यात मध्यात जात्याव भगून तर भांडान हॉतॅ ना! नाय तॅ, ते शहराशॅ माहनॅ, ब्लॉक मिनॅ रॅत्यात. ना कुना अध्यात ना कुना मध्यात. ना कुनाहरी बॉल्यासा, ना हायासा.

त्यांना हायादोपन टाईम नाय. निसती पळापळ. भगून तुला हांगातॅ ते माहने एकत्र जमालृन जोरजॉराय आहात्यात. त्याला लाफ्टर क्लब बॉलात्यात. डॉक्टर हांगात्यात माहनाई दिहातनॅ दोन-तीन वॅळा जॉरजॉरात आहला पाय, ती माहनाई गरज हाय. - मॅ हांगातॅ भांडानपन जाला पाय. ती पन माहनाई गरज हाय. आन सरकार हांगातॅ तंटामुक्त गाव. मिनजॅ भांडान कऱ्यादो बंदी. च्या मारी आतॅ बॉल!"

मतेस अरॅ तू हांगाता ता पन थॉडा बरबर हाय रॅ. मालापन एक आयडिया सुसलॅ. शहरात जहॅ लाफ्टर क्लब आहात्यात, तॉहॉ आपल्या गावात बी.टी. क्लब काढलॉ तर?

'मिनजॅ इ का भानगड हाय?'

आरॅ बी.टी. क्लब मिनजॅ भांडान-तंटा क्लब. मयन्यातनॅ एकदा जकल्याई एकत्र जम्यासा आन ॲकमॅकाहरी 'भांड्यासा'

हा ! आतॅ काहा बोयलॉ! झकास आयडिया हाय.

पन मतेस, भांडान-तंटा मिनजॅ खॉटा खॉटा भांड्यासा पुना जकला बाहॉन जासा. तॅ शहराशे लोक कहे खॉटा खॉटा आहात्यात ताहा आपुन खॉटा खॉटा भांड्यासा, मिनजॅ तू हांगाता तॅआ परमानॅ आपला जीवन अळनी हॉनखर नाय. आपलॉ गावपन तंटामुक्त रॅदॅ आन गावाला बक्षीस पन मिळदॅ.

वा! पेदर तंटामुक्त गावमंडळा तुला अध्यक्ष कॅला पाय. मा मत तुला आत्तॅस दॅऑन ठोयतॅ.

# जीवनाई संजीवनी – फा. (डॉ.) रॉबर्ट बी. डिसोझा, पसायदान, नाळे

दामूकाका आज कॉरॉ हॉतॉ. माथ्याला तॅल लावॉन माथा उकलॉन दारपूडशा बाकोर बॅहॅलतॉ. दापुडनॅ जन्याकाका जातोतॉ. दामूकाकाला बऱ्या कपडॅत शकाशक बगॉन जन्यो बोयलॉ, ‘दामुआ कडॅ साल्लॉ?’ दामूकाकानॅ तॉंड पाताळ कॅला, ‘कडे नाय, आज आमसॉ एक दोसत यासॉ हाय गावड्योरनॅ. तॅआ हरी भय बगॅआ जासा हाय.’ मॅरनॅ शिमू जातोतॉ. जन्यो शिमुला हांगातॅ, “बग ऑ दामु कॉडॉ सुदारलॉ तॉ. नाय तॅ तू? घारादारा साप सॉकाट कॅला.” शिमूइ सटकाली. खांदयोरशी कावड बाजूला ठवीत तॅनॅ कब्जाआ खिशातसा पइट काडला.

शिमूआ हाथात ता दारूआ पइट बग्तास दामु ओट्योरनॅ खाला उतारलॉ. “शिमूआ मॅ तूआ पाया पडॉ गा ? ता पइट गटारात उडवॉन दे. या दारूनॅ मा साप वाटॉळा कॅलॅ. मा ऐक. ए जन्या, तॅआ हाथातसा ता पइट घेऊ.” दामूकाका काकुळतीला यॅवॉन बॉलातोतॉ. ता बगॉन शिमू बगितुस रॅलॉ. तॅला त्यावॅळॅला कयतरी वाटला. गटार अमाशा हवूदे गा पितर अमाशा, दामु सतत गटारातूस पडलॅलॉ. अह्यासॉ. आज ऑ माला दारू प्यादो बन करतॅ, दारूला गाळयो मारतॅ मीनजॅ यामीनॅ खरोखर बदल जालॅ. तॅनॅ ता पइट ताहास कब्जाआ खिशात ठविला. तॉ दामुआ हाथात हात घालॉन ओट्योर सडलॉ. जन्यो तॅआ मिंगारनॅ पायऱ्यो सडॉन दामुआ ओट्योर आलॉ. दामू बाकड्योर, शिमू हिंदाळ्यात आन जन्यो भुयोर अहे जकले बेहेले.

‘आरॅ दामु’, शिमूनॅ विषयाला हात घायलॉ. “तूआ मिनॅ एकदम ऑडॉ बदल कॉहॉ का जालॉ.?” दामूनॅ हाथाय तॉंड ढाखिला. तॉ लाजल्याहारकॉ मान खाला घालॉन बॅहॅलॉ. तव शिजूकाकय घरातनॅ बार आली. “बाप्पा रे, आज इ जकली कंपनी अडे का करतॅ ? थांबा जकल्यांदो शा करतॅ. बिन दुदाओ सलदे ना ? दूध आला नाय आज.” जन्यानॅ टॉलॉ मारलॉस, ‘सलदे गनी, नाय तरी ऑडे वहरे या शा शी कुनाला आठोन तरी होती आ? दामूनॅ फरशी घारा सकऱ्यो कय कमी घायल्यात गा ? हांज नाय, हाकाळ नाय, दॉपार नाय, तिपार नाय, टाइम नाय, सुमार नाय, जिगाळा बगॅ तिगाळा फरशीआ घारास पडलॅलॉ.” शिजूकाकायनॅ तॅला मिन्नॅस थामविला. ‘कुनॅआ ! मॅ तुमशा सब्दाआ आड येतॅ पन आज दोन मयनॅ हव्यादो आल्यात, याई टिमकॉ सुदा घेटलेली नाय.’ शिमूनॅ मिनॅस तॉंड घायला, ‘दोन मयनॅ ? आला माला दोन तास भारी पडलॅत. तुमॅ का इलाज कॅलॉ माला तरी हांगा ना कुमारे.”

तॅयो वार्ता रंगात आल्यो तॉस शिलूकाका तडे हजर जालॉ. शिजूकुमारी घारात शा कऱ्यादो गेली. शिलूकाकानॅ जकल्याइ खबारबात घेटली. ‘दामुआ, काहा का सल्लॅ? शोवीस तास फक्त आजसॉ दी कॉहॉ का वाटलॉ आपलॉ प्रोग्रामू? शिलूकाकानॅ दामू दरी सौकशी केली. ‘तुमा जकल्यांना माइ कानी माइत हाय. दामूनॅ हांग्या सुरवात केली, ऑ शिलू माला दोन मयन्याआदी भॅटलॉ, फरशीआ घरनॅ मॅ जकल्याइ वाईल काडीत घारा येतोतॉ. माइ झॉक जातोती. शिलूनॅ माला घारा पोशविला. शिजूला हांगीला, ‘याला कय खा प्यादो दे आन निजूंदे. मॅ उद्या हाकोटे आलॉ.’ मा डोळ्योर कानसोळी आल्ती पन कान साप हॉथॅ गनाय. मॅ ता आयकीला आम विसार कॅलॉ, ‘शिल्या तु जाय रॅ. कुनाऑ बाप जरी आलॉ तरी तॅला पुरॉ पडनॅ. तु का समजालॉ.’ शिलू कॉपात तुमी कय वाईट वाटॉन घॅऑ नाका. पन दुहऱ्या दी तुमी जर आलॅ नसतॅ ना तर आज मॅ कडॅ कॉपरॅअॅत पडलॉ असतॉ ता मॅ कय हांगुस शकॅसॉ नाय.’ दामूआ इ बॉलना आयकॉन शिमू आन जन्यो शिलूकाका तोंडोर डॉक्या लागलॅ. शिलूकाका कडेतरी मीटिंगला जातॅ इ तॅआ काना आल्ता. ‘शिलूआ,’ जन्यानॅ तॉड उगड्ला, ‘इ जादू तु कही का केली ? आमाला जरा कय हांग ना.’ तौस शिजूकाकय शा शे कोपे आन तळनायो रोटयो घॅवॉन आली. शिमूआ तॉडाला जाम पानी हुटलॉ. ‘कुमारे, यो रोटयो कडश्यो?’

‘मा मायारा लगीन आला गना. हाऊरॉ केल्तॉ. तुमी शा घ्या.’ आहा हांगॉन शिजूकाकय आतलॅगा गेली.

दामू, शिमू, जन्या आन शिलू जकल्याइ दोन-दोन तळनायो रोटयो आन एक एक कॉप शा सा तडकायलॉ. तॉपुहीत शिमू हांगातॅ, ‘दामूआ कुमारीनॅ शा मस्त केल्तॉ हा.’ जन्यो मिन्नॅस बोयलॉ, ‘ता जक्ला रेओंदे. शिल्या आमाला इ कानी हांगु.’ शिलू काकानॅ दामूओर बगीला. दामूनॅ तॅला हळूस डॉळॉ मारलॉ आन मुंडी हालविली. तॉहॉ शिलू काका बॉलतॉ जालॉ.

“ताहा जॅ बगीला ना तॅ इ दारू हॉड्ना ऑडा कय जड काम नाय.”

बरोबर! मॅ किती वखत हॉडॉन दावडली बगा गनी” शिमू हावात हावात बोयलॉ.

“पन ती होड्ल्योर तीआ पासून लाम रॅना जिकरीआ काम हाय. तॅआ करता आमशा मीटिंग मिनॅ फक्त आजसॉस दी दारूआ विखारी घॉटापासून आमी लॉकांना लाम रॅआ हांगातॅव.”

“मीनजॅ दररॉज ताहा करॉन दारूपासॉन कायमसा लाम रॅसा? इ कुना बापाला नाय जमॅसा.” जन्या बोयलॉ.

हा. आज कॉबडा लोक एक-एक दिहाशा हिसपानॅ १०, १५ , २०,२५, ३०-४० वहरे दारूपासॉन लाम रेले.” शिलूनॅ मत मांडीला.

“शिलू हांगातॅ ता बरबर हाय, आतॅ माइस वार्ता हांगातॅ बगा. मॅ एक-एक दिहाशा हिस्पान ६० दी मीनजॅ दोन मयनॅ दारू पिलेली नाय.” दामूनॅ आपली हकीकत हांगिली.

‘पन माय कय मित्र हात तॅआहरी मॅ खुब वॅळा दारू पिले. कतॅ कतॅ तॅआ पैशान पन पिले. आतॅ मॅ जर होडली तॅ ते हांग्या लागॅद्यात की, बगा, यानॅ आमशा पदरशी पिली आन आतॅ आंगोर आला भगून ऑ दारू हॉडॅसा ढॉंग करतॅ.’ शिमूनॅ जकल्या पूडॅ मन मॉकळा कॅला.

शिलूकाकानॅ तॅइ समजूत काडली, ‘ पयली गोस्ट मीनजॅ आपली विसार करनॅइ पद्धत आपुन बदल्या पाय. शिमूनॅ हांगीला तॉहॉ विसार कॅलॉ तॅ इ दारूआ राज आहास सुरू रॅनार. तॅत कॉड्या लॉकांव बळी जातॅ मायती हाय गा? दुहरी गोस्ट, आपुन दारू होडत्याव ती कुनास करता नाय आन कुनास भरोश्योर नाय. जॅनॅ तॅनॅ आपलॉ निर्णय घ्यासॉ आन तॅइ आख्खी जबाबदारी सॉता घ्याशी.’

शिलूकाकाआ बोलन्योरनॅ जकले विसारात पडले. दारू हॉडॅशी हाय खरी पन तॅआ आदी बरॅस प्रश्न हॉडव्या लागणार इ जन्या आन शिमूआ धॅनात आला. तॅआ मीनॅ बी दोन मयनॅ दारूआ घॉटापासून लाम रॅलॅलॉ दामू आतॅ सुदारलॉतॉ. शेवटी दामूनॅ तॅतनॅ उपाय काडलॉ., “शिलूआ, या हॉमवारॅ आपुन जन्याला आन शिमूला ए ए शा मिटिंगला यासा वारना दिलोसा तॅ? अरे तडे ज्यो साक्षी देत्यात ना त्यो आयका बास. दारू होड्ल्योर कॉड्या लॉंकाये संवसार माकून उबॅ रॅल्यात. त्यायो तब्येती का जाल्यात!

त्याय पैशॅ कॉडॅ वासल्यात ! त्याये बायकू पोरे मॅरॅदारॅ हात. लॉकां मीनॅ तॅन्ना कॉबडॉ मान मिळातॅ ! तॅआ जीवनाला कोडी शिस्त आले.” दामू बॉलातूस रॅलॉ.... जन्या-शिमू बगीतुस रॅलॅ..... शिजू काकय शा शे रिकामे कोपे घॅवॉन गेली. शिलूकाकानॅ जन्या-शिमूला विसारला, ‘आतॅ का विसार हाइ ?’ जन्यो बोयलॉ, ‘आतॅ एक एक दिहाशा हिस्पान माला या दारूआ विखारी आन सत्यानाशी घॉटापासून लाम रॅसा हाय.’ शिमू हांगातॅ, ‘मॅ पन मिटिंगला ॲनार.’

आजशी ए ए शी मीटिंग बेताम रंगात आलती. शिलूकाकाव ३५वॉ, दामू काकाव १५वॉ, जन्या काकाव १४वॉ वाड दी साजरॉ करॅदो जकले तॅआ गावातशा हॉलमीनॅ जमलोते. पावलू कॉपातनॅ ॲकॅका नाव घॅऑन तॅन्ना पूडॅ बोलविला. तॅआनंतर शिलूकाका, दामूकाका, जन्यो आन

शिमू यांना केक काप्यादो पूडॅ बोलविला. केक कापॉन जाल्योर तॅंन्ना टोकन दिलॅ गॅलॅ. मंग एकेकाई साक्ष दिली. तॅंआ कुटूमाशे थोडे लोक पन आज मिटिंगला आलतॅ. तॅतशा दॉगा-तिगाई साक्ष दिली. इ जक्ला सुरू असतानास पावलू कॉपातनॅ नवीन सभासदाये नावे घॅवॉन तॅंआ स्वागत कॅला आन तॅंन्ना माकून माकून मीटिंगला यासा वारना दिला. इ मीटिंग मीनजॅ ए ए शा जीवनाई संजीवनी हाय. मीटिंग बरी जाली हायदॅ तॅ तॅआ श्रेय दॅवा कृपेला दॅवॉन पावलू कॉपातनॅ मनशांती पराथना घेट्ली.

दॅवा, जॅआ परिस्थितीला आमी

बदलू शकाव नाय

तॅआ परिस्थितिऑ स्वीकार करॅशी

मनाई परसन्नता आमाला दे.

जी परिस्थिति आमी

बदलू शकातॅव

ती बदल्या दो  आमाला हिंमत दे

आन या दोन परिस्थितिमीनसॉ

फरक आमाला हुमजावॉ

तॅतॅन आमाला बुद्दी दे.

जकले बोयले : - येत ऱ्या... येत ऱ्या... येत ऱ्या....

# विनोदी कान्यो - बबिता राजेश डिसोजा, वाघोली

बाबा : फरशा आपल्या भाटात लॉंगरा पिकलॅ.

फरशा : बाबो, काल मॅ लॉंगरा भय्याला दावडला... पन सवदॉ कय पटलॉ नाय.

बाबा : फारशा, पिकला पान गळातॅ ई माईत हॉता रॅ..... पन पिकलॉ फनॉ कहॉ गळालॉ.

फरशी : बाबो, फनॉ कय गळालॉ, बिळालॉ नाय... तुमसॉ ऑ पुत वरसॉ फनॉ घॅऑन मरी बायश्या घारा दारू घ्यादो वळालॉ.

---

बाबा : हन हन पेटीऑ खन

पोरी : बाबो मिनजे का?

बाबा : आतॅ नाताळ सॉ हन आलॉ गा तुला फराक, तु बयला नवा लुगडा, तु आयला साडी, मादो पोन्या.

पोरी : आनी बाबो, मा पपाला.

बाबा : तू आयसॉ नवरॉ कय हाडतॅ गा, आयतवारसा मटन तॉडा बरबर न सुकता हाडतॅ. बी तॅला हन - बीन कय कामा धावपळीत माईत पडात नात.

बय : तॉ देवळा जातॅ ना. पोरे, आतॅ नाताळ सॉ हन आलॉ.... मिनजॅ मा पेटीऑ खन खाली हॉयदॅ.

हॉवॉन जाऊदे खर्च.

**खित**

बो हाकोटे गॅसवर शा ठविलॉ, गा माला तु फुक मारॉन सुलीओर शा ऊकळविताना दिखाता.

सपाती भाजी खाताना बो तू हातशॅ पॉळॅ, जॅला शंभर भोके, तू शा मिनॅ बुडवॉन माला देतोती, तॅई माला आठोन येते.

घरशे कामे आटोपॉन, रस्त्याकडॅनॅ खॉयारा गुंडाळॉन देवळा जाताना बो तू माला दिखाता.

ता खॉयारा या थंडी दिहात बो  तूला ऊब देतोता ई माला आतॅ जाणवातॅ.

दॉपारश्यापारा तू हातात सुवार्ता घॅऑन, तॅआमिनशॅ फोटो बगताना, सोळी हिवताना, बो तु माला आतॅ रिकाम्या हिंदाळ्यात दिखाता.

तू हाताशॅ वालाय गॉळॅ घालॉन केलेल्यो धापट्यो, सुलीवर भुजीलॅलॅ खॉल्याशॅ पालगे, कॉरास्मात उपास होडताना, बो तूई माला आठोन येतॅ.

लानपनी बो तु आमशे खूब नेलवाड कॅलॅ, तुआ आजारपनात आमे तुआ मॅरॅदॅरॅ बेहले, तुई सेवा केली, तुआ हरी वार्ता केल्यो, अडेस आपली जकली वजाबाकी जालती.

तरी बो माला तुई खुप खुप आठोन येतॅ.

रॉज सातशी आयमेरी जाली, आठसा देवळा घाट वाजला... गा हातात रोजरी घेतलेली बय, तु माला गळ्यात रोझरी घायलॅल्या मावली मिनॅ दिखाता, आनी बो,  तुई आलेली खित माई अडेस मॉडातॅ.

---

## खीत - सबिना फोस, गास

हल निंगूत बॅठॉन गॅलॉ तरी
तुई खीत माकून येतॅ माला
आथासॉ आथ कय
हॉडवॅस नाय.

रातशी मॅ हापातॅ
तुआस हपान बगीतॅ
तुआ बिगार विहंबॉ
माला लाऑस नाय.

तुआस बलनी मॅ आव्हातॅ
तुईस वाट बगित जगातॅ
तुआ बिगार दुनिया कहीं ती
माआ गाईस नाय.

कॉड्यापन ओखत बॅठ
कॉड्यापन वखत बॉल
तरीपन माई खीत कय
मॉडॅस नाय.

# बो तू रांद आन मा पॉटाई नांद - रिचर्ड मच्याडो, टोरोंटो, कॅनडा

(फरशा अन झुज्या जिवलग मित्र. गरीब परिस्थितीमुळॅ शिक्षान जाला नाय. त्यामुळॅ लिखान-पदान नाय. खुब मेहनत करॉन दॉगाई आपले कुटुंबे वाडविले. खुब भॉटॉ त्याग कॅलॉ त्याई पन त्याआ त्यांना ना सुख हॉता ना दू:ख. जा का जीवनात पुडॅ आला त्याव खुशीनॅ स्वीकार कॅलॉ. फरशाला तिन्ही पोऱ्यो आन झुज्याला दोन पॉर. त्या काळात पोऱ्याआ बापाला मान नॉतॉ पन नंतर पोऱ्याये बरे शिक्षानॅ आन लग्ने जाले. एक पोरी तॅ कॅनडात स्थायिक जाली. मग पोरीनॅ आयबापाशी कॅनडाई वारी केली. कॅनडात रॅवॉन फरशा जाम खुश झालॉ. घरा परत आल्योर त्यानॅ झुज्याला जा हांगीला त्यावर ई एकांकिका हाय. मरीबायसा घर मंजॅ दोगाआ नॅहमीसा ठिकान जडे तॅ नॅहमी नवटाक-पावशेर मारत्यात, मरी बाय पन ई प्रवासवर्णन आयकॉन चाट पडली.)

(पयला दृश्य :- फरशा त्या जावायश्या घरनॅ परत जात असताना रस्त्यात त्याला झुज्या भॅटातॅ)

झुज्या : अरॅ फरशा, हा कडॅ आन आलॉ कतॅ.

फरशा : माआ जिवलगा, मॅ जिवंत हाय. आन कालूस आलॅ. पन माई बायकू कय माला निजॉन दे नाय. तिनॅ आतॅस पोरी घरा ता सामान पॉशव्या हांगीला. तू बरॉ हा ना.. तब्बॅत तॅ बरी दिखातॅ.

झुज्या : फरशा, का हांगॉ, जीव हाय भगून जगातॅ. नाय तॅ मेलॉसॉ तॉ बरॉ. तुयी तब्बॅत तॅ बरी दिखातॅ. पक्कॉ तांबडॉ तुंबडॉ करॉनूस पोरीनॅ धाडलॅ.

फरशा : झुज्या, का हांगॉ तुला. आपुन कतॅ ओडी भोटी दुनिया बगीली नाय. मूंबयला माला सगळ्योस इमारती हारक्यो दिखात्यात. पन झकास हाय अमेरिका.

झुज्या : अरॅ कॉडॅ दी तडॅ हॉतॉ आन का कॅला आन का खाला ता तरी हांगॅदा गा नाय.

फरशा : खॉटा कादो बॉल्यासा पन मा जावाय आन

पोरीनॅ आमशी खुब सोय केली. आमाला कय कमी पडॉन दिला नाय.

झुज्या : दगड तरलॅ आन हेनी बुडल्यो. पोऱ्यो हात तॅ जिकले आन आमे पॉरावाळे पार बुडले. तुला एका मागॉमाग तीन पोऱ्यो जाल्यो तिगाळा माला वाटला तू खपलॉ. पुडॅ तूआ का हव्यासा ? पन तू जिकलॉ. मॅ मात्र ऑबायशा हातसा सुमाळना जालॅ. माई कारभारनी ती त्यापेक्षा, न बोयलेलास बरा.. जॉ दी भरातॅ तॉ खरॉ.

फरशा : तॅ दी आठविलॅ गा डॉळयात पाणी येतॅ. पन दॅवानॅ सगळा निभाऑन निला. माआ कारभारनीनॅ खूब खस्ता खाल्यो. आतॅ बरॅ दी आलॅ, तुयॅ पन बरॅ दी येद्यात.

(झुज्याआ पाठीओरनॅ हात फिरवीत फरशा त्याआ सांत्वन करतॅ)

झुज्या : जाउन्दे, तडे का कॅला आख्खो दी आन कडे कडे फिरलॉ.

फरशा : का बग्याशी ती दुनिया. ना कसरा ना घान, सगळा कहा बारलेला... बरा.. आपलॉ आशवीत्यात तॉ पानी कडे जातॅ तॉ पन दिखॅ नाय. कसरा आन सांडपान्याई माला खीत आली.

झुज्या : आडॅ पाय टाकॅ तॉ चिखलात, आन लोक बी सांडपानी रस्त्यात होडत्यात आन देवळात जात्यात. ज्याला जा बरा दिखॅदॅ ता तॉ करतॅ. बरा... लोकबिक आपल्या हारका गा.

फरशा : अरॅ, लोक हाय गा नाय, कुन दिखॅ नाय. ना आवाज ना गोंगाट ना कुत्र्याव बोंबाट, माहनॅ घरात हात गा नात ता पन कळ्यासॉ मार्ग नाय. कुन कुनाला काय विसरी नाय, जॉ तॉ आपल्या कामात.

झुज्या : आडॅ तॅ जातायेता, कडॅ गॅलतॉ आन कडॅ जाऑन आलॉ त्याव हिशेब द्या लागातॅ. दोन-तीन डोकऱ्यो हात ना, त्यो कुनाला होडीत नाय. आन माहनाव मारॉ नाय पडलॉ ना तरी कुत्र्याव पडतॉस आहातॅ.

फरशा : तू बरी कुत्र्याय आठवन केली, अरॅ, कुत्र्या-मांदरीये तडॅ बरॅ दी आल्यात. अरॅ, त्यायी खरी मजा हाय. काय त्यायॅ लाड करत्यात.

झुज्या : ऑडॅ तॅ आपुन कुत्र्याआ नजऱ्यात नाय दिखाव..

फरशा : पुडश्या जन्मात कुत्र्याआ जन्मा घायला तॅ तडॅ घाल्या पाय.

झुज्या : तुयी पोरी आन जावाय बरे हात ना.. बरा.. आपल्या अडसा कुन भेटलॉता गा नाय.

फरशा : सगळे बरे हात. हिनवार-आयतवार तर आमॅ घरास नाह्याशे. आपली खुब मंडळी हाय तडॅ. सगळेस आमाला बोलवित्यात. मा वजान वाडला. खासा आन प्यासा तरी कॉडा.

झुज्या : मास्तरशी कंपनी बरीस हाय ना.

फरशा : मास्तरशा सगळ्या पॉरापोरीनॅ आमाला बोलविला. मोत्याशेठशी नातनी केले त्यानॅ माई सोय झकास केली आन आपलॉ खिवनीसॉ पॉर हाय त्यानॅ माकून मोत्याशेठशी दुहरी नातनी केले. वसईशी कंपनी खुब हाय, आपुन कुनाला ओळखात्याव ?

झुज्या : गरीब लोक तडॅ हात गा, सगळेस शेठ..

फरशा : गरीब कुन अन शेठ कुन. सगळेस गाडीत फिरात्यात. बायकू अन गवमाहनू, कतॅ कतॅ कळॅपन नाय.

झुज्या : सगळे पांढरेस हायद्यात.

फरशा : पांढरे हात, काळे हात आन आपलॅ फॅट्यावाळॅ पन हात. यॅ सरदारजी कत्तॅ तडॅ पॅासलॅ. आपुन त्याई चेष्टा करत्याव.

झुज्या : ऑडॅ सरदारजी तडॅ हात गा ! कमाल हाय, लोक कडॅ पॅासलॅ आन आपून हाव तडॅस हाव.

फरशा : कहा बोयलॉ ! खरा हांगॉ तुला, दुनिया कडे पडले, पन आपला घर बरा अन् आपुन बरे. आपले माहने जातायेता बॅालात्यात, तडॅ तर कुन कुनाबरबर बॅालॅ पन नाय. जॉ तॉ कानाला कयतरी लाविलॅ आन कय आयकित्यात देव जानो..

झुज्या : पोरीला किती पोरे ? एक पॅार आन एक पोरी ना.

फरशा : हा, नातू आन नातनी.. तॅ का बॅालात्यात ता माला समजॅ नाय आन माला का हांग्यासा हाय ता त्यांना उमजॅ नाय.

झुज्या : नायतरी अडशे पोरे तरी आपला कडॅ आयकात्यात, सगळ्यांना नावानॅ हाक मारत्यात नातॅ सगळेस अंकल.

फरशा : आतॅ त्या पॅाराई आडॅ कादो यॅ. तॅ तडॅस ऱ्याशे, लग्ने तरी आपल्यात हॅायद्यात गा नाय कूनॅ बगिलॅ.

झुज्या : मग तडशी बऱ्यापैकी कय हाडले गा नाय.. मादो कय तरी हाड्यासा..

फरशा : तडशी दारू न एकदम मोळी.. आपली मरीबायशी दारू का ? एकदम झकास.. पिल्याबरबर तुला कहा घुमरवितॅ.. आख्खी बाटली पिलीतरी तूला तडशी दारू सड्याशी नाय.

झुज्या : मग आपुन मरीबायश्या दरी गेलेले बरे. तू गेल्यापासून मॅ तडॅ गॅलॉ नाय. नायतरी तिनॅ परत उधारी विसारेस.

(दुहरा दृश्य – फरशा आन झुज्या, मरीबायश्या घरा दारू प्या जात्यात. तडॅ पयलॉ त्यांना मरीबाय सॉ राग बग्या लागातॅ)

झुज्या : मरीबाय ओ मरीबाय, हा गा नाय, कय बॅालॅ पन नाय ती..

मरीबाय : होय, होय.. मेली नाय, मेल्योर कोड्यो हाको माऱ्यात त्यो मारा.. का जालॅ ?

झुज्या : मरीबाय, बगीलॉ गा नाय, अमेरिकेसॉ पावनॉ आलॅ.

मरीबाय : अरॅ कुन्या, तुमॅ आलॅ कतॅ, गेले तॅ कय न बॉलता गेले, आमॅ कय तुमश्या मागॅ लाग्योते.

फरशा : मरीबाय, का हांगॉ तुला., सगळी उतॅळी जाली. पोरीनॅ तडनॅ फोन कॅलॉ आन आमशे तिकिटेस काडॉन धाडले. माआ कारभारनीला वाटातॅ जकलास अडसा तडॅ नॅवो गा का ? का का तिनॅ बॅगमिनॅ भरला ता बोल्यादो नाका, त्या भानगडीत कुनाला कय पन हांग्यासा रॅला..

मरीबाय : माला कय त्याव राग नाय पन बाय नॅ पन कय बॉयला नाय. बरा.. तुमसॉ प्रवास पन चांगलॉ झालॉ. खुब कय बगीला हाय दॅ.

फरशा : तुला जकला हांगातॅ पन पयली अर्दी बाटली हाड. आपली घरशी ती घरशी दारू. तडश्या दारूला कय सव हाय गा ?

झुज्या : बरॉबर बोयलॉ, मरीबायश्या डारुला सवूस निराळी.

मरीबाय : तुमॅ कय बॉलॉ नाका, तुमाला मॅ दारू दॅनार नाय. उधारी कूनॅ द्याशी.

झुज्या : मरीबाय, आतॅ सगळॅ पैशॅ डॉलरमिनॅ दॅनार अन तू पैशाला घाबरल्या ? फरशानॅ आतॅ बॅग भरॉन पैसॉ हाडलॅ.

मरीबाय : त्या पैशाला आग लागॉ, लंकेत हॉना हाय पन त्याव आपल्याला का फायदॉ.

(मरीबाय दारुयी बाटली हाडॉन देतॅ, दोगीपन दारू पॅवॉन टाईट हॉत्यात)

फरशा : मरी बाय, का हांगॉ तुला, दारू बाठल्यो सॉबात्यात पन दारू कय कामाय नाय

मरी बाय : तडॅपन आपल्याहारकास लोक हाय दॅ ना !

फरशा : सगळे हारखेस, कुन पोन्या नॅहातॅ अन कुन लांबी टूमन घालतॅ. कुन गाडीत जातॅ अन कुन पायी फिरातॅ, कुन मटन खातॅ तर कुन डाळ खातॅ. आपलॅ रितीरिवाज निराळॅ तहॅ त्यायो रितीभाती निराळ्यो. बाकी आपल्यास हारके माहने, त्यांना दुःख हाय न सुख पाय.

झुज्या : दारूबद्दल आबारी... येतॅ मॅ..

दे मरी नवटाक दे ग

पयल्या धारीशी नवटाक दे ग

दे ग दे नवटाक दे पयल्या धारीशी (फरशा आन झुज्या गानॉ बॉलात जात्यात)

## वंशायो दिवॉ – आब्राहाम तुस्कानो, घोटकाल, नंदाखाल

नाव मा मर्शी
घरात म्येस होती सर्शी

पण पॉराआ लगीन जाला
ऑबाय घरात आली
आन आतॅ तीस मालकीन जाली
खोलीमिनशी माई खाट
आतॅ ओहरीत आली

हांज-हाकाळ घरासॉ सैपाक
आतॅ म्येस करतॅ
वर ऑबायशे बोलने खातॅ
इ आहास कय ?
ता ताहास कय ?
जाता येता टॉमनॅ खातॅ
शिळापाखा खावॉन रॅतॅ

मास घरात माईस आतॅ
अडसन जाली
आतॅ तर माई खाट
एकदम जिन्याखाला आली

सगळे हांगात्यात पॉर पाय पॉर पाय
वंशाला दिवॉ पाय
म्हातारपनाई ती काठी
पन मा नशिबी आली
भीक माग्याशी वाटी.